रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १८ • अंक ५५
www.ramprahar.com
शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## छत्तीसगडमध्ये कुख्यात म्होरक्यासह १० नक्षलवादी ठार



**रायपूर :** छत्तीसगडमध्ये तब्बल एक कोटी रुपयांचे इनाम असलेल्या नक्षलवाद्यांच्या म्होरक्यासह १० नक्षलींना यमसदनी धाडण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे. मैनपूरच्या जंगलात ही धुमश्चक्री उडाली. गुप्त सूचनेनंतर सुरक्षा दलांनी जंगलात लपलेल्या नक्षलवाद्यांना घेरले. या नक्षलवाद्यांमध्ये एक कोटींचा इनामी मोडेम बाळकृष्णदेखील असल्याचे समोर आले होते. ओडिशा आणि छत्तीसगड सीमेवर बाळकृष्ण कुख्यात होता. त्याला मारण्यात यश आले आहे. या कारवाईत राज्य पोलीस, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) आणि कोब्रा बटालियनच्या तुकड्यांचा समावेश होता. बालकृष्ण हा ओडिशा राज्य समितीचा वरिष्ठ सदस्य होता, ज्याच्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. त्याच्यासह १० नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे.

### अंतरंग
लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार; मुलगी गर्भवती/३
श्रीवर्धनचा दुर्गम भाग मोबाईल नेटवर्कविना/५
पालीच्या अंबा नदीपात्रात आढळला मृतदेह/७

# कुणालाही सरसकट आरक्षण दिलेले नाही

## मुख्यमंत्र्यांची माहिती; ओबीसींवर अन्याय होऊ देणार नसल्याची ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

कुणबी नोंद असलेल्या मराठ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी अध्यादेश काढला आहे. या अध्यादेशाला आव्हान देणाऱ्या दोन याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना भूमिका मांडत कुणालाही सरसकट आरक्षण दिलेले नसून ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही दिली.

पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सरकारने काढलेला अध्यादेश विचारपूर्वक काढला असून तो कायदेशीर आहे. हा अध्यादेश कुणालाही सरसकट आरक्षण देत नाही. ज्यांच्याकडे पुरावा आहे व जे खरे कुणबी आहेत त्यांनाच प्रमाणपत्र देण्याकरिता हा अध्यादेश मदत करतो. त्यामुळे या अध्यादेशामुळे कुठेही ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही.

न्यायालयातही राज्य सरकारच्या वतीने आम्ही योग्य भूमिका मांडू. मी पुन्हा एकदा ओबीसी समाजाच्या नेत्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सरकारचा अध्यादेश नीट वाचा, कुठेही सरसकट आरक्षण दिलेले नाही. कायद्याने पुराव्यानिशी जे लोक अर्ज करतील, त्यांचा पुरावा तपासूनच आणि तो योग्य असेल तरच यामध्ये आरक्षण मिळणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील ओबीसी संघटनांकडून मुंबईत मोर्चा काढला जाणार आहे, याबाबतही मुख्यमंत्री फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, अशा प्रकारचा मोर्चा काढण्याची कोणतीही



आवश्यकता नाही. वेगवेगळ्या ओबीसी नेत्यांशी माझीदेखील चर्चा होत आहे. आम्ही ज्यांना ज्यांना अध्यादेश समजावून सांगत आहोत त्यांचे समाधान झालेले आहे, पण कुणाला राजकीयदृष्ट्या एखादे काम करायचे असेल तर त्यांना मी थांबवू शकत नाही. सामाजिक दृष्टीने सांगू इच्छितो की, हे सरकार आहे तोवर ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही.

### राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक

महाराष्ट्रातील गुंतवणुकीत आपण जी आघाडी घेतली आहे, ती पुन्हा एकदा एक लाख ५०० हजार कोटींवर गेली असून याचे करार झाले आहेत. त्यामुळे आज याचा आनंद वाटतो आहे की, त्यातून ४७ हजार जणांना रोजगार मिळेल. डेटा सेंटरची उभारणी रायगडमध्ये होईल, नाशिकमध्ये नंदूरबारमध्ये २१०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे, ज्यातून लोकांना रोजगार मिळेल. विदर्भात रिलायन्स फूड पार्क आणि शीतपेय पार्क उभारून १५०० कोटींची गुंतवणूक करणार आहोत. अदानींचीदेखील ७० हजार कोटींची गुंतवणूक असणार आहे, असे म्हणत राज्यातील उद्योजकीय गुंतवणुकीवर मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

### सरकारी सेवा डिजिटल पद्धतीने मिळणार

आपले सरकारचे व्हर्जन जुने झाले असून आपण समग्र नावाच्या संस्थेशी करार केला आहे. त्यानुसार नागरिकांना कोणत्या योजनांची निकड आहे, याचा अभ्यास केला आहे. आता आपण डिजिटाइज पद्धतीने सेवा देण्याचा प्रयत्न करणार आहोत तसेच नागरिकांना व्हॉट्सअपवर सेवा मिळणार आहेत. त्यामध्ये २०० सेवा आणि योजना २६ जानेवारीपर्यंत नागरिकांना डिजिटाइज पद्धतीने मिळण्यास सुरुवात होईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. राज्यात सेवा आणि सुविधासंदर्भातील डिजिटाइज पद्धतीचा पहिला टप्पा २६ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होईल, तर २०० सेवा आणि योजना २६ जानेवारीपर्यंत आणि संपूर्ण सेवा १ मेपर्यंत पूर्ण करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

## लाडक्या बहिणींना ऑगस्टचा सन्मान निधी मिळण्यास सुरुवात



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी जमा होण्यास आजपासून सुरुवात झाल्याची माहिती महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी गुरुवारी (दि.११) दिली. त्यांनी महिला सक्षमीकरणाची क्रांती अखंडपणे सुरू असल्याचेदेखील एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे.

मंत्री तटकरे यांनी एक्स पोस्टद्वारे म्हटले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी १ हजार ५०० रुपये वितरित करण्याच्या प्रक्रियेस आजपासून सुरुवात होत आहे. महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या अखंड विश्वासाने सुरू असलेली सक्षमीकरणाची ही क्रांती यशस्वीरित्या मार्गक्रमण करत आहे. लवकरच या योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी वितरित होणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र राज्यातील महिलांसाठी सुरू केलेली एक कल्याणकारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना देणे, त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करणे आणि कुटुंबात त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे हा आहे. जुलै २०२४पासून या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली. आतापर्यंत १४ हप्त्यांची रक्कम पात्र महिलांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

(छाया : इजाज मनियार)



पेण : गणेशमूर्तींचे हब असलेल्या जोहे गावात साखरचौथनिमित्त जोहेचा राजाची पाच दिवसांसाठी प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या ठिकाणी न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थी व शिक्षकांच्या हस्ते पहिली आरती झाली. विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानतर्फे वही, पेन, आरती संग्रह व खाऊ देण्यात आला.

## लाचप्रकरणी सिडकोतील तिघांसह चार जण जेरबंद

**नवी मुंबई : बातमीदार**

साडेतीन लाखांची लाच स्वीकारल्याप्रकरणी सिडको सहनिबंधक कार्यालयातील सहनोंदणी अधिकारी धनाजी दत्तात्रय काळोखे, कार्यालयीन सहाय्यक राहुल रंगराव कांबळे, शिपाई महेश गंगाराम कामोठकर यांच्यासह सिडको सहकारी संस्थेतून निवृत्त झालेले किशोर मोरे यांना जेरबंद करण्यात आले. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील कांबळे व कामोठकर यांच्याविरुद्ध सिडकोकडून निलंबनाची कारवाई करण्यात आलेली असून लाचखोर वर्तनाबाबत शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे काळोखे यांना तत्काळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्याचबरोबर त्यांच्यावर निलंबन व शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस सिडकोतर्फे त्यांच्या मूळ विभागाकडे पाठविण्यात आली आहे.

फिर्यादी यांच्या सोसायटीची २०२२ साली निवडणूक होऊन तक्रारदार व इतर आठ सदस्य निवडून आले होते. तक्रारदार यांना सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून नेमले होते, मात्र कालांतराने त्यातील पाच सदस्यांनी राजीनामा दिल्याने कमिटी रद्द करण्याबाबत अर्ज दाखल करण्यात आला. त्यामुळे सहनिबंध सहकारी संस्था सिडको यांच्यातर्फे प्रशासकाची नेमणूक करण्यात आली तसेच सन २०२३-२४ची सर्वसाधारण सभा उशिरा झाल्याने कमिटीवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.

या मागणीवर सुनावणी होऊन उपनिबंध सहकारी संस्था सिडकोने 'क्लोज फॉर ऑर्डर' असा निकाल दिला, मात्र निकाल तक्रारदार यांच्या बाजूने देण्यासाठी पाच लाख रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. तडजोडीअंती तीन लाख ५० हजार रुपये कबूल झाल्यावर फिर्यादी यांनी याची माहिती नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिली. त्यानुसार सापळा रचून सिडको सहनिबंध कार्यालयातील सहकारी संस्थेचा शिपाई महेश कामोठकर याला लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. (पान २ वर..)

### निवडक

#### राज्यपाल देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राचा अतिरिक्त कार्यभार

**नवी दिल्ली :** देशाचे नवे उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन शुक्रवारी (दि. १२) शपथ घेणार आहेत. त्यामुळे राधाकृष्णन यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींनी गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवलाय.

#### अभिनेत्री ऐश्वर्या रायचे फोटो परवानगीविना वापरण्यास मनाई

**नवी दिल्ली :** प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन हिच्या फोटोंचा अश्लील स्वरूपात गैरवापर केला जात आहे. त्यामुळे तिचे नाव, फोटो आणि व्यक्तिमत्त्वाचा परवानगीशिवाय व्यावसायिक हेतूंसाठी वापर करण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने संकेतस्थळांना मनाई केली आहे.

## पोलादपूरजवळ कार अपघातात एक ठार, पाच जण जखमी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पोलादपूर तालुक्यातील भोगाव हद्दीत एक इको कार संरक्षक भिंतीला धडकून एक प्रवासी ठार, तर अन्य पाच जण जखमी झाले. हा अपघात गुरुवारी (दि. ११) पहाटे सव्वातीनच्या सुमारास घडला. मृतासह जखमी प्रवासी पुणे जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

अपघातग्रस्त कार (एमएच १४ केएस ०२३१) मुंबई बाजूकडून गोव्याच्या दिशेने जात होती. कारचालक लिंगप्पा कटप्पा पातारे (वय २८, रा. निगडी, पुणे) याचा ताबा सुटून कारने भोगाव पुलावरील कठड्याला धडक दिली. या वेळी कार कलंडून झालेल्या अपघातात अनिल देविदास कांबळे (वय ५५, रा.चहोली, ता.हवेली जि.पुणे) यांचा जागीच मृत्यू झाला, तर धनराज प्रभाकर मगर (वय ४२), विकास शंकर चव्हाण (वय १८), मोहन गोरोबा चव्हाण (वय ४२), नागनाथ मल्लिकार्जुन कांबळे (वय ३५), वाहनचालक लिंगप्पा पातारे (वय २८, सर्व रा. पुणे जिल्हा) जखमी झाले. पोलादपूर पोलीस आणि कशेडी पोलीस मदत केंद्राच्या पथकाने आवश्यक ती कार्यवाही केली.

### अभिनंदन अन् शुभेच्छा!






मुंबई : अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीच्या नगराध्यक्षपदी भाजपचे पराग मेहता निवडून आले आहेत. याबद्दल भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मेहता यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे भाजप पाली शहर अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारलेल्या सुशील शिंदे यांनाही प्रदेशाध्यक्षांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी खासदार धैर्यशील पाटील, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार आदी उपस्थित होते.

## पनवेलच्या चारही प्रभागांमध्ये होणार दैनिक बाजार







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती अ (खारघर), ब (कळंबोली), क (कामोठे) आणि ड (खारघर)मधील विविध भूखंडांवर दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सिडको प्राधिकरणाकडून दैनिक बाजार बांधकामाकरिता भूखंड उपलब्ध झाले आहेत.

या भूखंडांवर बऱ्याच काळापासून तात्पुरत्या बांधकामासह बाजारपेठा सुरू आहेत. या ठिकाणी नव्याने कायमस्वरूपी बांधकाम करून दैनिक बाजार बांधण्याचे प्रस्तावित आहे, ज्यामुळे नागरिकांना बाजारांची चांगली व सहजपणे व सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहे.

खारघर प्रभाग अ मध्ये सेक्टर ३,४,६,११,१२,१५ व २० मधील एकूण १५ ठिकाणी गरजेनुसार विविध ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहेत. कळंबोली प्रभाग ब मध्ये सेक्टर २,२ ई, ५ ई, ६, १०,१२, १४,१५मध्ये १६ ठिकाणी दैनिक बाजार बांधण्यात येणार आहेत. कामोठे प्रभाग समिती क मध्ये सेक्टर १७मध्ये ३८ ओटे, सेक्टर २१मध्ये १४ ओटे, सेक्टर १८मध्ये ४६ ओटे, सेक्टर १०मध्ये १४ ओटे अशा पाच ठिकाणी दैनिक बाजार बांधण्यात येणार आहेत. पनवेल प्रभाग ड मध्ये सेक्टर ६, १एसई, २ ई, ३ ई, ४ ई, ७ डब्ल्यू, ८ डब्ल्यू, १० डब्ल्यू, ५ए, ५ मधील १० ठिकाणी गरजेनुसार ओटेसंख्या असलेले दैनिक बाजार बांधण्यात येणार आहेत.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार या दैनिक बाजारांसाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीदेखील मिळाली आहे. येत्या काही दिवसांमध्ये हे काम पूर्ण होऊन नागरिकांच्या सेवेत सर्व सोयी-सुविधांनी युक्त असे प्रशस्त दैनिक बाजार उपलब्ध होणार आहेत.

## सोलापुरात अतिवृष्टी; जनजीवन विस्कळीत

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापूर शहरात रात्रभर कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी शिरल्याने नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य भिजून नुकसान झाले आहे.



सोलापूरमध्ये गेल्या २४ तासांत ११८.३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. अचानक झालेल्या पूरसदृश परिस्थितीमुळे रस्ते व वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली. मित्रनगर, जुना विडी घरकुल परिसर, अक्कलकोट रोड परिसरातील पंजावणी मार्केट तसेच होटगी रोड तलावाजवळील घरे पाण्याखाली गेली. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गही पाण्याखाली गेला.

या अतिवृष्टीमुळे शेतामध्येही पाणी शिरले. प्रशासनाने मदतकार्य सुरू केले असून नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात येत आहे. दरम्यान, आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोलापूरमधील परिस्थितीची माहिती दिली. मुख्यमंत्र्यांनी नुकसानग्रस्तांना मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद
मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...
ramprahar@gmail.com

# उद्योग आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र सर्वोत्तम राज्य -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : रामप्रहर वृत**

महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम आहे. 'इज ऑफ ड्युईंग बिझनेस'अंतर्गत राज्यात गुंतवणूक आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जियो वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे इंडिया–ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स (आयएबीसीए) ग्लोबल फोरम लिडर्स मीट आणि सीईओंसोबत राऊंटटेबल कॉन्फरन्स वेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते.




गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तत्पर असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन विविध क्षेत्रांविषयी नवीन धोरण आखत आहे. येत्या काळात १४ क्षेत्रांसाठीची धोरणे जाहीर होणार आहेत. त्यामध्ये सेवा क्षेत्राचा समावेश आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये सेवा क्षेत्राचा मोठा वाटा आहे. उद्योजकांना गुंतवणूकदारांना अडचणी येऊ नयेत सर्व परवानग्या लवकर प्राप्त करता याव्यात या साठी मैत्री पोर्टल निर्माण करण्यात आले आहे. एक खिडकी योजना असून उद्योजकांना राज्यात गुंतवणूक करताना चांगला अनुभव यावा यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

इज ऑफ ड्युईंग बिझनेस मध्ये नव्याने सुधारणा करण्यात येत आहेत. गुंतवणुकीच्या नवीन संकल्पना राबवण्यात येत आहेत. राज्यात एक्सप्रेस वे चे जाळे उभारले जात आहे. वाढवण बंदरामुळे राज्य सागरी व्यापार क्षेत्रात महत्वाचा भागीदार असणार आहे. संपूर्ण राज्यातील महत्त्वाची ठिकाणे सहा तासाच्या अंतराने वाढवण बंदराशी जोडली जात आहेत. राज्यात सांडपाणी व्यवस्थापन, त्यावरील प्रक्रिया, सौर ऊर्जा, पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. त्याचा ऑस्ट्रेलियातील उद्योगांनी फायदा घ्यावा. या क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा. पुणे येथे नवीन विमानतळ उभारण्यात येत आहे. त्यामुळे पुणे शहराच्या विकासाला आणखी गती मिळेल. पुण्यात जलद वाहतुकीसाठी पायाभूत सुविधांचे नवनवीन प्रकल्प उभारण्यात येत आहेत. शासन उद्योग आणि गुंतवणूकदारांसाठी सकारात्मक निर्णय घेत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या राऊंड टेबल कॉन्फरन्सपूर्वी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी निमंत्रित व उद्योगांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ऑस्ट्रेलिया हा शिक्षण क्षेत्रातील एक अग्रगण्य देश आहे. अनेक भारतीय विद्यार्थी तिथे शिक्षणासाठी जातात. आता हेच शिक्षण नवी मुंबई येथील 'एज्यूसिटी' मध्ये मिळणार आहे. तसेच गोंडवाना विद्यापीठाशी कुर्निल विद्यापीठाने केलेल्या करारामुळे खाणकाम क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे शिक्षण उपलब्ध होऊन त्याचा फायदा गडचिरोली जिल्ह्यातील लोह उद्योगाला होईल. गडचिरोली ही देशाची लोह राजधानी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'महिलांच्या आर्थिक सक्षम कर्जासाठी विशेष धोरणाचा लाभ द्या'

**मुंबई : प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक माग विकास महामंडळ , महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ,वसंतराव विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळासाठी वैयक्तिक कर्ज व्याजगती परतावा लाभार्थी महिलांना व्यवसाय करण्यासाठी व आर्थिक व्यवहार करा. सक्षम करण्यासाठी विशेष कर्ज धोरण राबत आहे.या असे कर्जशी महामंडळाने मुंबईशी कराराचे निर्देश दिले व महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले.

मुंबई राजकारणाने सुरू केलेल्या विशेष कर्ज योजना अंगणवाडी प्रशासकीय बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली होती. राज्य मंत्री आदिती तटकरे, अध्यक्ष प्रवीण दरेकर ,चित्रा वाघ , अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, विभागाचे सहसचिव. ठाकूर ,वित्त विभागाचे सहसचिव



स्मिता निवतकर , सहसचिव मु. प्र. साबळे , वसंतराव सोडक्या विमुक्त व भटक्या जमाती जाती विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रताप पवार , महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक आनंद लोमटे आदि अधिकारी होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की , मुंबईकर योजनाला व्याज परतावा प्राधिकृत करून सामंजस्य करार. महामंडळाच्या व्यवसाय परतावा लाभाच्या लाभ महिलांना लाडकी बहीण लाभार्थींना अपात्र उमेदवारी लाभत नाही. या जल्लोष विशेष सूचना जारी करण्यात येत आहे. या महिलांना पुढील पात्रता लाभणार आहे.

मुंबईदौऱ्याच्या उपक्रमांतर्गत महिलांना एक लाख कर्ज आहे. १० महिला एकत्र५ ते व्यवसाय करू शकतात. दहा हजार ते एक लाख कर्ज उपलब्ध आहे असे मुंबईचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी सांगितले. मुंबईत एकूण १६.०७ लाख बचत खाती आहेत. खाली माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत ५३, ३५७ महिलांची शून्यता खाती उघडली. पात्र महिला शासन दरमहा १५०० खात्यात जमा होत आहेत.

# पितृपक्षात कावळे कमी असल्याने पितरांच्या नैवेद्यासाठी तारांबळ

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांपासून गावखेड्यापासून शहरापर्यंत सगळीकडे शहरीकरण वाढल्याने पक्षांची संख्या कमी झाली आहे. त्यात कावळ्यांचीही संख्या कमी होत चालली आहे. वृक्ष तोडून विकासाच्या नावाखाली बिल्डर सिमेंट काँक्रिट चे जंगल वाढवत इमारती बांधत आहे. त्यामुळे पितृपक्षात कावळ्यासाठी नैवेद्य अर्पण करणे कठीण झाले आहे. त्यामुळे पक्ष्यांचे महत्त्व कळण्यासाठी शहरात जनजागृतीची आवश्यकता आहे.

दरवर्षी पितृपक्षात कावळ्याला श्राद्धाचे अन्न भरवण्याची प्रथा आहे. पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी कावळ्याला भोजन दिले जाते. मात्र, अलीकडच्या काही वर्षांत वाढत्या शहरीकरणामुळे झाडे तोडली जात आहेत आणि पक्ष्यांचे अधिवास नष्ट होत चालले आहेत, त्यामुळे कावळ्यांची संख्या



लक्षणीयरीत्या कमी झाली आहे.

कावळ्यांची संख्या कमी होणे ही पर्यावरणाबाबतची गंभीर समस्या आहे. यामुळे पक्ष्यांचे महत्त्व आणि पर्यावरणाचे संवर्धन किती महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा समोर आले आहे. या प्रथेमुळे लोकांमध्ये पर्यावरणाप्रती जागरूकता वाढवणे किती गरजेचे आहे याची प्रचिती या पितृपक्षात येत आहे. काही लोक आता कावळ्यांच्या तुलनेत इतर पक्षी जसे की कबुतरे, चिमण्यांना अन्न देऊन पितरांचे स्मरण करत आहेत. या पार्श्वभूमीवर पक्ष्यांच्या अधिवासाचे महत्त्व किती आहे लक्षात येते

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात भव्य ई-वेस्ट संकलन मोहीम; पर्यावरणासाठी एक पाऊल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पृथ्वी आपली आई आहे, तिचे रक्षण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, या उद्गारांनी प्रेरित होऊन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने जून, जुलै आणि ऑगस्ट २०२५ या तीन महिन्यांत भव्य ई–वेस्ट संकलन मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेत विद्यार्थ्यांनी नवी मुंबईतील विविध भागांमधून मोठ्या प्रमाणात कचरा गोळा केला व थ्रेको ई–वेस्ट मॅनेजमेंट कंपनीकडे योग्य पुनर्वापर व प्रक्रिया करण्यासाठी सुपूर्द केला. या पर्यावरणीय उपक्रमासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. महेश धायगुडे यांनी या उपक्रमासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा. योगिता पाटील व प्रा. प्रमोद वाघे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत हा उपक्रम यशस्वी केला तसेच प्रा. शुभांगी ठाकूर, प्रा. सोनाली सोनकर आणि प्रा. आकांक्षा त्रिपाठी यांनीही मोलाचे योगदान देत मोहिमेला बळ दिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे व प्रा. प्रथमेश उदेकर समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व प्रेरणा मोहिमेला लाभली. निसर्गाला जरायुद्ध दिले नाही तर तो आपल्या बाजूने उभा राहतो, पण त्याचे संतुलन बिघडले तर आपल्यालाच नुकसान होते,असा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

# रसायनीत महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील तुराडे ग्रामपंचायतमधील महिलांसाठी नुकताच सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये महिलांना ब्युटी पार्लर व आर्थिक साक्षरता यांबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

ज्या महिलांना आपली कला व्यावसायिक दृष्टीने सादर करायची आहे, अथवा काहींना घरातूनच आपल्या कौशल्याने आर्थिक उत्पन्न निर्माण करायचे आहे. यांसाठी ओटीकर कंपनी, संहिता आणि स्पेरूल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व तुराडे ग्रामपंचायतीच्या सहकार्याने ग्रामपंचायत हद्दीतील महिलांसाठी ३० दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले गेले. यामध्ये महिलांना ब्युटी पार्लरचे प्राथमिक प्रशिक्षण देऊन किट देण्यात आले. तर, आपली आर्थिक बचत कशी करावी, बचत केल्याचे फायदे, कोणकोणत्या माध्यमातून बचत करावी? अशा विविध मुद्यांच्या आधारावर आर्थिक साक्षरता प्रशिक्षणही यावेळी देण्यात आले. एकंदरीत या शिबिरासाठी तुराडे गाव, कष्टकरी नगर, मुकुंदवाडी, ठाकूरवाडी येथील एकूण ८० महिलांनी या शिबिरात सहभाग घेतला. सहभाग घेतल्याप्रकरणी महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# अतिरिक्त आयुक्तांकडून रस्ते दुरूस्ती कामांची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खारघर प्रभागातील सेक्टर ३५, तळोजा गाव ,कोयनावळे येथील रस्ते दुरूस्तीची आज दिनांक ११ सप्टेंबर रोजी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी प्रत्यक्ष पहाणी केली. रस्ते दुरूस्तीची कामे तातडीने करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी खराब झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती लवकरात लवकर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.त्यानूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी आज खारघर प्रभागातील तळोजा गाव ,कोयनावळे येथील रस्त्यांची प्रत्यक्ष पहाणी केली. व तात्काळ रस्ते दुरूस्ती करण्याबाबत संबधित विभागाच्या




अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी प्रभाग अधिक्षक जितेंद्र मढवी, अभियंता प्रकाश दोडे, महापालिका अधिकारी व संबधित ठेकेदार, कर्मचारी उपस्थित होते.

सध्या पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे युध्द पातळीवर सुरू आहेत. यामध्ये ,खारघर प्रभागात खारघर रेल्वे स्टेशन रोड, सेक्टर ६, उत्सव चौक ते गुरूद्वारा , शिल्प चौक, तळोजा गाव, कोयनावळे, पालेखुर्द, अशा विविध भागात रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने केली जात आहे.नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंताशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**रस्त्याबाबत तक्रारी असल्यास संबधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा**

१. राहुल जाधव, कळंबोली, ८२३७२०८४२५
२. मयूर गडकरी, खारघर, मो.नं. ९१३७२११४९९
३. प्रतिक आंग्रे, न. पनवेल, मो.नं. ९३२११४१०७२
४. किरण पाटील, मो.नं. ९६६४५३८२०९

# अलिबागमधील हातमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री आता १८ सप्टेंबर राहणार सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोलापूरच्या भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग कापड भव्य प्रदर्शन व विक्री ग्राहकांच्या आग्रहानुसार व नवरात्र उत्सवानिमित्त १८ सप्टेंबर पर्यंत वाढवण्यात आले आहे. डोंगरे हॉल सार्वजनिक वाचनालय अलिबाग येथे ते १८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

हातमागावरील विणकाम करून तयार केलेले कापड अत्यंत चांगला दर्जाचा असते. त्यामुळे हातमाग कापड प्रदर्शनाचा अलिबागवासियांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रदर्शनाचे प्रमुख पुरुषोत्तम पोतन यांनी केले.



भारतीय संस्कृतीच्या प्रसारासाठी व हातमागाचे विणकाम करून वापरण्यायोग्य कापड तयार केले जाते. या कापडाच्या वापरामुळे कोणत्याही प्रकारचे त्वचारोग होत नाही हे कापड तयार करण्यासाठी अधिक मनुष्यबळ लागत असल्याने सध्या हातमाग कापडाची निर्मिती कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे या व्यावसायामध्ये आमची नवी पिढी येत नसल्याची खंत पांडुरंग पोतन यांनी व्यक्त केली आहे. या प्रदर्शनात कॉटन साडी विविध प्रकारच्या विक्री साठी टेवण्यात आले आहे. सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २०% टक्के सुट ठेवण्यात आले आहे.

पान १ वरुन

## लाचप्रकरणी सिडकोतील तिघांसह चारजण जेरबंद

या प्रकरणी सिडको सहनिबंधक कार्यालयातील शिपाई महेश कामोठकर याच्यासह सहनोंदणी अधिकारी धनाजी दत्तात्रय काळोखे, कार्यालयीन सहाय्यक राहुल रंगराव कांबळे, शिपाई महेश गंगाराम कामोठकर यांच्यासह सिडको सहकारी संस्थेतून निवृत्त झालेले किशोर मोरे अशा चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर कोणत्याही सिडको अधिकारी, कर्मचाऱ्याने किंवा त्यांच्या वतीने अन्य व्यक्तीने लाचेची मागणी केल्यास या प्रकरणी तत्काळ सिडकोच्या दक्षता विभागास तक्रार नोंदवावी. अशा तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधिताविरुद्ध कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे सिडकोकडून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

# इंदापूर येथे आग लागलेल्या दुकानांना मंत्री गोगावले यांनी केली आर्थिक मदत

**माणगाव : बातमीदार**

इंदापूर येथे शनिवार दिनांक ६ सप्टेंबर रोजी रात्री लागलेल्या आगीत तीन दुकाने व एक हॉटेल यांचे लाखोचे नुकसान झाले असून या दुकानदार व हॉटेल मालकाला बुधवार दि.१० सप्टेंबर रोजी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी इंदापूर येथे येऊन दुकानदार यांना आर्थिक मदत केली.

शाम कदम,अमित ओसवाल,पारसमल याची तीन दुकाने तर बबलू जैसवाल यांचे हॉटेलचे खूप मोठे नुकसान झाले असल्याने प्रत्येकी ५०,००० रुपये व किरकोळ नुकसान झालेल्या एका दुकानदाराला २५००० रुपये आर्थिक मदत दिली.भरतशेठ गोगावले यांनी आपले महाड मतदार



संघात किंवा श्रीवर्धन मतदारसंघात कोणताही, कोणावरही प्रसंग येवो, त्यांनी कधीही मतदार संघ पाहिला नाही.ना पाहिली जात किवा धर्म–पक्ष, त्यांनी पाहिली फक्त जिव्हाळ्याची माणसं आणि माणुसकी. संकट कधीही कोणावरही येवो ते रात्री अपरात्री धावून जात असतात. इंदापूर येथे आग लागल्यानंतर मध्यरात्री सर्व यंत्रणांना संपर्क करून इंदापूर येथे घटनास्थळी तातडीने अग्नीशमन गाड्यांची व्यवस्था करून आग आटोक्यात आणली

## खोपोलीत आज रिझर्व्ह बँकेचे जनसंपर्क शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या वित्त विभागाच्या निर्देशानुसार ग्रामपंचायत स्तरावर परिसरातल्या बँकांमार्फत विशेष जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबई पुणे जुन्या महाराजा मंगल कार्यालयात शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता होणाऱ्या या शिबिराला रिझर्व बँकेचे कार्यकारी निर्देशक, नीराज निगम ,रायगड जिल्हाधिकारी, व खोपोली खालापूर तालुक्यातील बँकांमधील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. परिसरातील नागरिकांनी ग्राहकांनी या शिबिराला भेट देऊन लाभ घ्यावा

# पोलीस असल्याची बतावणी करून कार पळवली

**खालापूर : प्रतिनिधी**

पोलिस असल्याची बतवणी करुन रसायनी पोलीस ठाणे हद्दीत फिर्यादीची १ लाख–रुपये किंमतीची कार फसवणुक करुन घेउन पसार झाले.

पोलिसांनी देलेल्या माहिती नुसार रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०९ सप्टेंबर रोजी २१:१५ वा च्या सुमारास मौजे रिसवाडी, ता. खालापुर येथे फिर्यादी रा. चांभार्ली, पो. मोहपाडा, ता. खालापुर हे कर्जत ते चाभांर्ली असा त्यांचे मालकीच्या टाटा टायगो कारने प्रवास करीत असतांना मौजे रिसवाडी येथे आले असता अनोळखी मोटार सायकल वरील आरोपी यांनी संगणमत करुन फिर्यादी यांना साहेब असल्याची बतावणी करुन तुम्ही साहेबांची गाडी घासली आहे तुमची कार पोलीस ठाणेत घेवुन जावी लागेल असे बोलुन फिर्यादी यांना कारची चावी आरोपी यांच्याकडे देण्यास भाग पाडुन कार पोलीस ठाण्यात घेवुन जात आहोत असे सांगुन एकूण १ लाख–रुपये किंमतीची कार फसवणुक करीत पसार झाले.

याबाबत रसायनी पोलीसांत कलम गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस शिपाई ढोणे हे करीत आहेत.

# आजार टाळण्याकरिता काळजी घ्या!

## पावसाळ्यातील साथरोगांच्या पार्श्वभूमीवर मनपाचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या परतीच्या पावसाने महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी पाणी साठले असून या कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. या कालावधीत नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले आहे. तसेच महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

याच पार्श्वभूमीवर उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर यांच्या सूचनेनूसार वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने, आज पनवेल महानगरपालिका अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी केंद्र, आपला दवाखाना (सर्व) व स्वच्छता निरीक्षक यांची किटकजन्य व जलजन्य या साथीच्या आजाराविषयी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणी संदर्भात आढावा बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती.



या बैठकिस घनकचना व आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, साथरोगअधिकारी डॉ. आकाश ठसाळे, स्वच्छता निरीक्षक संजयजाधव, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील एचए, एमपीडब्लू व स्वच्छता निरीक्षक यांनी बैठकीस उपस्थित होते.

पावसाळ्यातील किटकजन्य रोग टाळण्याकरिता पालिका क्षेत्रातील सर्व सोसायट्यां कंस्ट्रशन साईटस्, भंगार दुकाने, टायर दुकान, नारळ विक्री दुकाने यांची महापालिके आरोग्य विभागाच्यावतीने तपासणी केली जात आहे. याचबरोबर जनजागृतीपर हॅण्डबिले, पत्रके यांचे वाटप करण्यात येत आहेत. ज्या सोसायट्यांमध्ये किटकजन्य रोगाचे रूग्ण आढळत आहे त्या सोसायट्याच्या अध्यक्षांनी , सचिवांनी किटकजन्य रोग टाळण्याबाबतच्या महापालिकेने दिलेल्या सूचना सोसायटीमधील रहिवाश्यांना द्याव्यात.तसेच महापालिकेसही idsppanvel corporationgmail.com या इमेल आयडीवरती माहिती कळवावी. तसेच पालिका क्षेत्रातील खाजगी लॅबधारकांनी किटकजन्य आजाराच्या रूग्णांची माहिती संबधित इमेलआयडीवरती द्यावी , जे खाजगी लॅबधारक ही माहिती कळविणार नाहीत अशा लॅबवरती महापालिकेच्यावतीने कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती व मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

### असे करा उच्चाटन

पावसाळ्यामध्ये अनेकवेळा दूषित पाण्यामुळे कॉलरा , गॅस्ट्रो, विषमज्वर, असे जलजन्य रोग होण्याची भिती असते त्यामुळे नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे तसेच भाज्या,फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात. सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा. घर व सभोवतालचा परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवावा. आपल्या इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी. साचलेले पाणी ,डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणे करून डास उत्पन्न होणार नाहीत. शिळे व उघड्यावरचे अन्न खाऊ नये, विहरीचे पाणी शुध्दीकरण करूनच पिण्यास वापरावे. अतिसार झाल्यास क्षार संजिवनी मिश्रणाचा वापर करावा. किटकजन्य रोगांचे निमुर्लन करण्यासाठी याची दक्षता घ्यावी. या रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे.

# अनधिकृत गॅरेज व्यवसायामुळे वाढती वाहतूक कोंडी

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहतीमधून बेलपाडा भारती विद्यापीठ आणि उत्सव चौकाकडे आणाऱ्या रस्त्यावर अनधिकृत गौज व्यावसायिकांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाला आहे. रस्त्यालगत थाटलेली ही गॅरेज फक्त वाहतुकीला अडथळा ठरत नसून, पदपथही व्यापून टाकत आहेत. परिणामी या रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असल्याने स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे वाहतूक विभागाने तातडीने हस्तक्षेप करून दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

उत्सव चौकातून भारती विद्यापीठाकडे आणि भारती विद्यापीठातून उत्सव चौकाकडे जाणारा रस्ता हा खारघरमधील महत्त्वाचा मार्ग मानला जातो. या रस्त्यावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. मात्र बेलपाडा गावाशेजारील मेट्रो मार्गालगत काही गॅरेज व्यावसायिकांनी खुले आम रस्त्यावर गॅरेज थाटली आहेत. वाहनांची दुरुस्ती, टायर बदलणे, तेल बदलणे यांसारखी कामे रस्त्यावरच सुरू असतात. त्यामुळे रस्त्याचा बराचसा भाग व्यापला जातो. पादचारी आणि वाहनचालकांना त्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

स्थानिक नागरिकांनी सांगितले, की या रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होते. सकाळ-संध्याकाळ ऑफिसला जाणाऱ्यांना पोहोचणे अवघड होते. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, जेव्हा कारवाई केली जाते तेव्हा गॅरेज व्यावसायिक स्वतः बाजूला होतात आणि त्यांच्याऐवजी कामगारांना समोर उभे केले जाते. नंतर किरकोळ दंड भरून प्रकरण मिटवले जाते. त्यामुळे अशा कारवायांचा फारसा परिणाम होत नाही. गॅरेज पुन्हा त्याच ठिकाणी सुरु होते. यामुळे वाहतूक पोलिसांवर 'डोळेझाक' केल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. तरी ही खारघर परिसरात अशी गॅरेज खुलेआम सुरू आहेत, ही बाब प्रशासनासाठी लज्जास्पद आहे. वाहतूक पोलिसांनी कडक कारवाई करून रस्ते मोकळे करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे मत आहे.

# पोलीस शिपाई बेपत्ता; तक्रार दाखल

**पनवेल : वार्ताहर**

रबाळे पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस शिपाई बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. सोमनाथ काशीनाथ फापाळे (३१) असे या पोलीस शिपाईचे नाव असून ते गेल्या ४ सप्टेंबर रोजी रात्रपाळी करून आपल्या घरी जातो, असे सांगून गेले होते, मात्र ते घरी पोहोचलेच नाहीत. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात सोमनाथ फापाळे बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली असून पोलिसांकडून त्यांचा शोध घेण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.



सोमनाथ फापाळे हे कळंबोलीतील रोडपाली भागात पत्नी वैशाली हिच्यासोबत राहतात. तसेच ते सध्या रबाळे पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. ४ सप्टेंबर रोजी रात्री सोमनाथ हे वाशी येथे झोन वन स्ट्रायकिंगच्या गाडीवर कार्यरत होते. याबाबतची माहिती त्यांनी त्यांच्या पत्नीला कामावर जाण्यापूर्वी दिली होती. त्यानंतर मध्यरात्री वैशाली यांनी त्यांना फोनवर संपर्क साधला असता त्यांनी झोन वन स्ट्रायकिंगच्या गाडीवर वाशी येथे असल्याचे सांगितले होते. त्यानंतर वैशाली यांनी सोमनाथ यांना संपर्क साधला असता त्यांनी नंतर कॉल करतो, असे सांगून फोन कट केला होता. तर, पावणेआठ वाजता सोमनाथ यांनी पत्नीला संपर्क साधून थोडेसे टेंशन आले असल्याचे सांगितले होते. मात्र, त्यांचा फोन आल्याने वैशाली यांनी ९ वाजता त्यांना कॉल केला असता त्यांचा फोन बंद असल्याचे आढळले.

दरम्यान, वैशाली यांनी सोमनाथ यांच्यासोबत असलेल्या पोलिसांचे नंबर मिळवून त्यांना संपर्क साधला असता सोमनाथ सकाळी ७.३० वाजताच घरी निघून गेल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर वैशाली यांनी इतर नातेवाईकांकडे सोमनाथ यांचा शोध घेतला, मात्र ते कुठेच मिळून आले नाहीत. त्यामुळे अखेर वैशाली यांनी ६ सप्टेंबर रोजी वाशी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली. त्यानुसार शोध घेण्यात येत आहे

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार; मुलगी गर्भवती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उरणमध्ये राहणाऱ्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाने इन्स्टाग्रामवरून ओळख झालेल्या रसायनी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण करून तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिल्यानंतर अल्पवयीन मुलाने पीडित मुलीसोबत लग्न करण्यास नकार दिला. उरण पोलिसांनी या प्रकरणातील अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

मुलगी रसायनी येथे राहण्यास असून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा १६ वर्षीय अल्पवयीन मुलगा उरण मध्ये राहण्यास आहे. या दोघांनी आपले शिक्षण अर्धवट सोडले असून या दोघांची इंस्टाग्रामवर ओळख झाली होती. त्यानंतर त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले होते. पीडित मुलीच्या आई वडिलांना काही महिन्यापूर्वी याबाबतची माहिती समजल्यानंतर त्यांनी उरण येथील अल्पवयीन मुलाच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती. त्यावेळी अल्पयवीन मुलाने पीडित मुलीसोबत लग्न करण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर पीडित मुलीच्या आई वडिलांनी पीडित मुलीचे वय पूर्ण झाल्यानंतर तिचे लग्न अल्पवयीन मुलासोबत लावून देण्याची तयारी दर्शवली होती. तसेच तोपर्यंत पिडीत मुलीला अल्पवयीन मुलाच्या घरी ठेवले होते.

दोघांमध्ये शरीरसंबंध निर्माण झाल्याने पीडित मुलगी गरोदर राहिली. त्यामुळे अल्पवयीन मुलाने व त्याच्या कुटुंबीयांनी पिडीत मुलीसोबत लग्न करण्यास नकार देऊन तिला घरातून हाकलून दिले. त्यानंतर पीडित मुलगी रसायनी येथील आपल्या आई वडिलांच्या घरी गेल्यानंतर तिने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरोधात लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याप्रकरणी तसेच पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल केला

# रिक्षाच्या धडकेत एक जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षाच्या ठोकरीने एक इसम जखमी झाल्याची घटना पनवेल शहरातील उरण नाका सर्कल येथे घडली आहे रिक्षा चालक अपघाता नंतर तेथुन पळुन गेला.पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

देवानंद म्हात्रे ( वय ४९ ) रा. नवीन पनवेल हे पनवेल शहरातील उरण नाका सर्कल येथे उभे असताना टपालनाका येथून आलेल्या रिक्षा चालकाने त्यांना ठोकर मारून झालेल्या अपघातात त्यांच्या पायाला मोठी दुखापत करून तो पसार झाला आहे .

या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून फरार रिक्षा चालकाचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत .

# प्रतिष्ठित सवाई गंधर्व महोत्सवात रायगड-नवी मुंबईला मानाचे पान

## जागतिक किर्तीच्या कलाकारांसोबत पं. उमेश चौधरी एकाच व्यासपीठावर येणार

**पनवेल : वार्ताहर**

पं. सवाई गंधर्व यांच्या ७३व्या पुण्यस्मरणानिमित्त कर्नाटक सरकारच्या कन्नड आणि सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या कुंदगोळ येथिल 'संगीत महोत्सवा'त रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांना शास्त्रीय गायनासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या महोत्सवात पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, विद्वान द्वारकिश एम., पं. गणपती भट यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या कलाकारांच्या सोबत पं. उमेश चौधरी यांना एकाच व्यासपीठावर गायनाची संधी मिळाली आहे. त्यामुळे रायगड-नवी मुंबईला या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित महोत्सवात मानाचे पान लाभले आहे.





हा महोत्सव दिनांक १५ व १६ सप्टेंबर रोजी कर्नाटकमधील संगीत सम्राट सवाई गंधर्व स्मारक भवन येथे होणार असून, देशभरातील नामवंत गायक-वादकांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.या संगीत महोत्सवाचे उद्घाटन १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर महास्वामीगलू, जगद्गुरू फकीर सिद्धाराम महास्वामीगलू यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी कर्नाटक राज्याचे ग्राहक संरक्षण व अन्न नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद शिंदे, आमदार एम. आर. पाटील, पत्तन पंचायत अध्यक्ष श्यामसुंदर देसाई, कन्नड आणि सांस्कृतिक विभागाचे सहाय्यक संचालक एम. एस. बेक्केरी यांच्या प्रमुख उपस्थितीत, तसेच सवाई गंधर्व स्मारक विश्वस्त संस्थेचे चेअरमन पद्मश्री डॉ. अरविंद काटगी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे.

या महोत्सवात पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे यांना 'सवाई गंधर्व राष्ट्रीय संगीत पुरस्कार' ने सन्मानित करण्यात येणार आहे. १५ सप्टेंबर रोजी पद्मश्री अश्विनी भिडे देशपांडे, विदुषी पद्मिनी राव, पं. उमेश चौधरी, पं. क्रिशनेंद्र वाडीकर, पं. रतन शर्मा, पं.अभिषेक जोशी, श्रीकांत देवी व राजेश्वरी पाटील यांचे शास्त्रीय गायन सादर होणार आहे. तसेच विद्वान द्वारकिश एम. व पं. आनंद पाटील यांची कर्नाटकी वीणा-गायन जुगलबंदी आणि हेमंत जोशी यांचे तबलावादन होणार आहे. १६ सप्टेंबर रोजी पद्मश्री एम. वेंकटेश कुमार, पं. गणपती भट, अशोक नाडगीर, वीणा हंगल यांच्यासह अनेक मान्यवर गायक आपले सादरीकरण करणार आहेत. रायगड-नवी मुंबईचे सुपुत्र, पं. उमेश चौधरी यांना प्रतिष्ठित सवाई गंधर्व संगीत महोत्सवात शास्त्रीय गायनाची संधी आहे




**सीकेटी कॉलेजचा माजी विद्यार्थी सर्वेश वसंत पाटील (रा. आकुर्ली) सध्या लंडनमध्ये उच्च शिक्षण घेत आहे. त्याने तिथे गेलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली.**

# पितृपक्षातील मागणीमुळे भाज्यांचे दर वाढले

**पनवेल: वार्ताहर**

पितृपंधरवडा सुरू होताच पनवेल परिसरातील भाजीपाला बाजारात सात्विक भाज्यांची मागणी वाढली आहे. मात्र मागणी अधिक आणि तुलनेने आवक घटल्याने दरवाढ झाली आहे. या काळात श्राद्धकर्म व तर्पणासाठी सात्विक आहार घेतला जातो. त्यामुळे फ्लॉवर, गवार, भेंडी, कारले, लाल भोपळा, वाटाणा, कच्ची केळी तसेच पालेभाज्यांच्या खरेदीत मोठी वाढ झाली आहे. मात्र राज्यातील अनेक भागांतील पाऊस आणि काही ठिकाणी पिके नष्ट झाल्याने आवक कमी झाल्याने दर झपाट्याने वाढत असल्याचे व्यापारी सांगत आहेत.

मेथी, पालक, कोथिंबीर या पालेभाज्यांचे दर २० ते ३० टक्क्यांनी वाढले असून, किरकोळ बाजारात भाज्यांच्या दरावर कोणतेही नियंत्रण नसल्याने दुप्पट ते तिप्पट दराने भाज्यांची विक्री होत असल्याचे व्यापारी सांगत आहेत. पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचा भाजीपाला बाजारापर्यंत पोहोचलेला नाही. तसेच, भाजीपाला नियमन मुक्त झाल्यामुळे बहुतांश शेतमाल थेट ग्राहकांना विकला जातो. त्यामुळे आवक मंदावून दर वाढले असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे . पावसाचे प्रमाण कमी होऊन आवक वाढल्यासच बाजारभाव स्थिर होऊ शकतील, असा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे.



### भाज्यांचे घाऊक दर

**फ्लॉवर** : २० ते ३२.रु.
**वाटाणा** : १२० ते १५० रु.
**गवार** : ६० ते ९० रु.
**भेंडी** : ६० ते ८० रु.
**कारले** : ४५ ते ६० रु.
**लाल भोपळा** : २० ते ३० रु.
**फरसबी** : ४० ते ५० रु.
**घेवडा** : ४० ते ५० रु.
**केळी भाजी** : २५ ते ३० रु.

# कोप्रोली येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कोप्रोली ग्रामपंचायतीच्या वतीने हुतात्मा स्मारक कोप्रोली येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावस्थरिय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर घेण्यात आलेल्या कार्यशाळेत ग्रामपंचायत अधिकारी प्रविण खैरे यांनी उपस्थितांसमोर ग्रामविकास विभागाकडील ६ ऑगष्ट २०२५चे शासन निर्णयाचे वाचन केले.

सदरचे अभियान हे दि.१७ सप्टेंबर २०२५ पासून ते ३१ डिसेंबर २०२५ राबविण्याचे असून,सदर परिपत्रकातील प्रश्नावलीचे केले.हे अभियान यशस्वी करण्यासाठी शासन स्तरावरील सर्वच विभागांनी ग्रामपंचायतीस योग्य ते सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.या कार्यशाळेसाठी वैद्यकीय अधिकारी,महसूल अधिकारी,शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर,मदतनीस,सी आर पी आरोग्य कर्मचारी व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



# गौरा गणेश दर्शन




**पनवेल : एकनिष्ठ मित्र मंडळ नवनाथ नगर वसाहत येथील गौरा गणपतीचे आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, जयंत पगडे, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, अजय बहिरा यांनी दर्शन घेतले. अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष रावसाहेब खरात, एकनिष्ठ मित्र मंडळाचे अध्यक्ष मनोज झिरे यांनी त्यांचे स्वागत केले. सोबत कार्यकर्ते.**





**पनवेल : कामगार नेते सुरेश पाटील यांनी सुकापुर येथील गणेश पाटील यांच्या घरी भेट देऊन दर्शन घेतले.**



**अचानक मित्र मंडळ, शिरढोण पाडा. ता.पनवेल**

## संपादकीय

# अशांत फ्रान्स

**समाजमाध्यमांवरील बंदीचे निमित्त होऊन नेपाळमध्ये तरुणांचे हिंसक आंदोलन पेटल्यानंतर आता फ्रान्समध्ये समाजमाध्यमांवरील 'ब्लॉक एव्हरीथिंग' आवाहनानुसार जाळपोळ, रस्ता रोको करून व्यवहार ठप्प केले जात आहेत. आर्थिक समस्यांच्या विरोधात फ्रान्समधील जनता वारंवार रस्त्यावर उतरते आहे. आर्थिक तोडगा काढताना खर्चकपात करणाऱ्या तब्बल चार पंतप्रधानांना तेथे वर्षभरात पद सोडावे लागले आहे. राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनीच राजीनामा द्यावा अशी आंदोलकांची मागणी असली तरी ते राजीनामा न देण्यावर ठाम आहेत.**

**नेपाळपाठोपाठ फ्रान्समध्येही सरकारविरुद्ध निदर्शने सुरू झाली आहेत. सोशल मीडियावरील 'ब्लॉक एव्हरीथिंग' आवाहनाने फ्रान्समधील निदर्शनांची यावेळी सुरुवात झाली. आर्थिक समस्यांविरोधातली निदर्शने फ्रान्समध्ये आता नेहमीचीच झाली आहेत. आर्थिक गैरव्यवस्थापनावरून फ्रान्सचे नागरिक राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या विरोधात रस्त्यावर उतरले आहेत. यावेळी त्यांनी नेपाळमधील घडामोडींमधून प्रेरणा घेतलेली दिसते. सध्या पॅरिससह फ्रान्सच्या अन्य भागांत आक्रमक आंदोलक सर्व व्यवहार ठप्प करण्याचा प्रयत्न करत आहेत. बेरोजगारी, महागाई, वाढती आर्थिक विषमता यांविरोधातला हा रोष आहे. नागरिकांच्या मते मॅक्रॉन सरकारने लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी काहीही केलेले नाही. २०२२मध्ये पुन्हा सत्तेवर आलेल्या मॅक्रॉन यांच्या कार्यकाळात फ्रान्सचे आर्थिक गणित पार कोलमडले आहे. युक्रेन-रशिया युद्धाचे परिणाम सर्वच युरोपीय देशांना भोगावे लागत आहेत. अमेरिकेने रशियावर आर्थिक निर्बंध लादले. त्यामुळे रशियाकडून होणारा खनिज तेलाचा पुरवठा खंडित झाला, तर युक्रेनकडून खाद्यतेल मिळेनासे झाले. फ्रान्सलाही याचे परिणाम भोगावे लागत आहेत. अमेरिका व अन्य देशांकडून महाग दराने इंधन खरेदी करावे लागल्याने फ्रान्ससारख्या देशांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. यामुळे फ्रान्सवरील कर्ज प्रचंड वाढले आहे. जवळपास ३१०० अब्ज डॉलरचे कर्ज सध्या फ्रान्सवर आहे. एकीकडे युद्धामुळे अपेक्षेप्रमाणे महागाई प्रचंड वाढलेली असताना बेरोजगारीही वाढली आहे. त्यामुळे पुन्हा निवडून आल्यापासूनच राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्याकडे राजीनामा देण्याची मागणी केली जाते आहे. गेल्या तीन वर्षांत याच मागणीसाठी फ्रान्समध्ये अनेक निदर्शने झाली आहेत. याशिवाय पेन्शन सुधारणांसाठीही देशव्यापी निदर्शने झाली आहेत. २०२४मध्ये फ्रेंच शेतकऱ्यांनीही संपावर जाऊन अनुदानात प्रस्तावित कपातीविरोधात निषेध केला होता. सार्वजनिक सेवांवरील खर्चात कपात करण्याच्या प्रस्तावांमुळे नागरिक संतप्त होऊन वारंवार रस्त्यांवर उतरत आहेत. अशातऱ्हेने पुन्हा पुन्हा अशांतता निर्माण होऊनही अध्यक्ष मॅक्रॉन राजीनामा न देण्यावर ठाम आहेत. त्यांनी उलट विरोधकांवरच ते सत्तेसाठी हपापले असल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे फ्रँकोइस बायरो यांना पंतप्रधानपद सोडावे लागल्याने मॅक्रॉन यांनी मंगळवारी रात्री उशीरा संरक्षणमंत्री सेबॅस्टियन लेकोर्नू यांची पंतप्रधानपदी नियुक्ती केली आहे. मॅक्रॉन सतत असाच स्वत:चा बचाव करत आले आहेत. एका वर्षातील हे फ्रान्समधील चौथे पंतप्रधान आहेत. एकीकडे नव्या पंतप्रधानांची नियुक्ती करण्यात आली असताना दुसरीकडे फ्रान्समध्ये निदर्शने सुरूच आहेत. लेकोर्नू यांना पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच अविश्वास ठरावाचा सामना करावा लागला आहे. सध्या आंदोलकांनी रस्ता रोको व जाळपोळ केल्यामुळे अनेक ठिकाणी दैनंदिन व्यवहार ठप्प झाले आहेत. सरकारने ८० हजार पोलीस तैनात करूनही आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून निदर्शने केली असून यातील सुमारे २५० जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या आंदोलनामुळे आता तरी फ्रान्समध्ये मध्यावधी निवडणुका होतील का हे येत्या काळातच स्पष्ट होईल.**

# मूकबधीर विद्यालयाचे काम का रखडले?

खबरबात
प्रकाश सोनवडेकर

अलिबागजवळील वरसोली येथे बंधण्यात येत असलेल्या शासकीय मूकबधीर विद्यालयाचे इमारतीचे बांधकाम चार वर्षांमध्ये पूर्ण होऊ शकलेले नाही. त्यामुळे हे विद्यालय खासगी भाड्याच्या जागेत चालवावे लागत आहे. ही जागा अपुरी असल्याने अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. कमी जागेमुळे मूकबधीर विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची होणारे गैरसोय, भाड्यापोटी दरवर्षी होणारा लाखो रुपयांचा खर्च याचा विचार करता मूकबधीर विद्यालयाची इमारत लवकर बांधून पूर्ण होणे आवश्यक आहे.



जिल्ह्यातील मूकबधीर मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी अलिबाग तालुक्यातील वरसोली ग्रामपंचायातीच्या हद्दीत विद्यानगर येथे शासनाने विद्यालय बांधले. नंतर शासनाने ही योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग केली. जागेवर मालकी महाराष्ट्र शासनाची आणि शाळा जिल्हा परिषदेची. अशा परिस्थितीत शाळा चालवली जात होती. गेली ३५ वर्ष शासकीय मूकबधीर विद्यालय कार्यरत आहे. जिल्ह्यातील एकमेव शासकीय मूकबधीर विद्यालय असल्यामुळे रायगड जिल्ह्यातील मूकबधीर विद्यार्थी येथे शिक्षण घेतात, पण इमारत नादुरूस्त झाल्यामुळे येथे नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकड पाठविण्यात आला. हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. शाळेची इमारत राजिपच्या ताब्यात असली तरी शाळेच्या जागेचा सातबारा सामाजिक न्याय विभागाच्या नावावर आहे. त्यामुळे शाळेची नवीन इमारत या जागेवर बांधण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या आयुक्तांची परवानगी असणे आवश्यक होती. त्याबाबतचा प्रस्ताव रायगड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने सामाजिक न्याय विभागाच्या आयुक्तांकडे पाठवला. आयुक्तांनी नवीन इमारत बांधण्यास परवानगी दिली.


या नवीन इमारतीच्या कामाचा शुभारंभ १५ ऑगस्ट २०२१ रोजी रायगड जिल्ह्याच्या तत्कालीन पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. शासकीय मूकबधीर विद्यालय नव्या इमारतीच्या कामाचा आदेश ४ जुलै २०२२ रोजी दिला गेला. ९६ लाख ५४ हजार ६०६ रुपये निधी मंजूर असून ठेकेदार याने सहा महिन्यात काम पूर्ण करून द्यायचे आहे. ठेकेदाराने तळमजल्याचे, वर्गखोल्यांचे बांधकाम पूर्ण करून द्यायचे होते. त्यानंतर पहिल्या मजल्यावर वसतिगृह बांधकामास मंजुरी मिळणार होती. हे काम दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र २०२५ संपत आले तरी इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊ शकलेले नाही.

जिल्हा परिषदेने स्वनिधीतून दोन कोटी ४६ लाख ९२ हजार रुपयांची तरतूद केली. ३१ गुंठे क्षेत्रात असलेल्या या जागेत एक मजली इमारत बांधली जाणार होती. त्यामध्ये आठ वर्ग खोल्या, मुले व मुलींसाठी स्वतंत्र निवासस्थान, विद्यालयातील अधिक्षकांसाठी कार्यालय व निवासस्थान, श्रवण चाचणी खोली, वैद्यकीय कक्ष, अंतर्गत खेळाची खोली व सुसज्ज असे सभागृह असणार होते. मूकबधीर विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी गार्डन, क्रीडांगण तसेच भोजन कक्ष, स्वयंपाकी निवासस्थान, व्यवसायिक प्रशिक्षण हॉल, पहारेकरी निवासस्थान आदी सुविधा उपलब्ध होणार आहेत, मात्र गेल्या वर्षभरापासून मूकबधीर विद्यालयाचे काम जवळपास ठप्प झाले आहे. त्याचा फटका मूकबधीर विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना बसत आहे. सध्या मूकबधीर विद्यालय भाड्याच्या घरात आहे. पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना व तेथील कर्मचाऱ्यांना शिकविताना अडचणी निर्माण होत आहेत. प्रशासनाच्या अनास्थेमुळे आणि ठेकेदाराच्या निष्क्रियतेमुळे मूकबधीर विद्यार्थ्यांना भाड्याच्या शाळेतच शिक्षण घेण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली आहे. येथे त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

नवीन ठेकेदार नेमण्याची प्रक्रिया बांधकाम विभागामार्फत सुरू करण्यात आली आहे. कामासाठी आवश्यक सर्व निधी उपलब्ध आहे. त्यामुळे नवीन ठेकेदार नेमून उर्वरित काम पूर्ण केले जाईल, असे रायगड जिल्हा परिषदेच्या सामजकल्याण विभागतर्फे सांगण्यात येत आहे.

अलिबाग येथे असलेले मूकबधीर विद्यालय हे रायगड जिल्ह्यातील एकमेव शासकीय मूकबधीर विद्यालय आहे. त्यामुळे या शाळेत शिकण्यासाठी जिल्ह्यातून विद्यार्थी येतात. गेली चार वर्षे इमारत नसल्यामुळे ही शाळा खासगी जागेत सुरू आहे. उपलब्ध जागेत शाळा सुरू आहे. नवीन इमारत झाल्यास त्यात विद्यार्थांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या शाळेची इमारत लवकर बांधून पूर्ण करणे आवश्यक आहे. काम का रखडले आहे याचा शोध घेऊन कामातील अडचणी दूर करायला हव्यात.

# गायक रामचंद्र कुंदगोळकर तथा सवाई गंधर्व



हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील थोर गायक व मराठी रंगभूमीवरील विख्यात गायक-नट रामचंद्र गणेश कुंदगोळकर उर्फ सवाई गंधर्व यांचा जन्म १९ जानेवारी १८८६ रोजी कुंदगोळ (जि. बेळगाव, कर्नाटक) येथे झाला. त्यांची गायनाची आवड लक्षात घेऊन वडिलांनी त्यांना १८९७-९८मध्ये बळवंतराव कोल्हटकरांकडे तालीम दिली.


पुढे किराणा घराण्याचे प्रवर्तक अब्दुल करीमखाँ यांच्याकडे त्यांनी गायनाची कसून तालीम घेतली. त्याचप्रमाणे निसार हुसेनखाँ, हैदरबक्ष, मुरादखाँ यांच्याकडून त्यांनी चिजांचे शिक्षण घेतले. १९०८मध्ये त्यांनी अमरावतीस 'नाट्यकला प्रवर्तक मंडळी'त गायक-नट म्हणून प्रवेश केला व ते स्त्री भूमिका करू लागले. त्या काळात बालगंधर्व यांच्या स्त्री भूमिका सवाई गंधर्व अत्यंत लोकप्रिय असतानाही कुंदगोळकरांच्या रूपाने स्त्रीभूमिका करणारा एक नवा गायक-नट रंगभूमीवर अवतीर्ण झाला व अल्पावधीतच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचला.

या लोकप्रियतेमुळेच वऱ्हाडाचे नबाब म्हणून प्रसिद्ध असलेले दादासाहेब खापर्डे यांनी अमरावती येथे १९०८ साली त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली व या टोपण नावानेच ते पुढे जास्त ओळखले जाऊ लागले. सवाई गंधर्व यांचा विशेष लौकिक झाला तो हरिभाऊ आपटे यांच्या संत सखू नाटकातील सखूच्या भूमिकेमुळे. या लौकिकाच्या पाठबळावरच त्यांनी स्वत:ची 'नूतन संगीत नाटक मंडळी' स्थापन केली व ती पुढे दहा वर्षे चालविली. त्यानंतर 'यशवंत संगीत मंडळी'मध्ये व शेवटी हिराबाई बडोदेकरांच्या 'नूतन संगीत विद्यालया'च्या नाट्यशाखेत अशी स्थित्यंतरे करीत १९३२मध्ये त्यांनी नाट्यजीवनाला राम राम ठोकला.

किराणा घराण्याच्या फिरतीत त्यांनी अधिक वैविध्य आणून गानपरंपरा अधिक समृद्ध केली. १९४२मध्ये त्यांना पक्षाघाताचा तीव्र झटका आला व परिणामत: पुढील दहा वर्षे त्यांचे गाणे पूर्णत: थांबले. पुणे येथे १२ सप्टेंबर १९५२ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : विकासपीडिया)

## बदलते तंत्रज्ञान

# घरी बसून भरा आयटीआर; ऑनलाईन प्रोसेस जाणून घ्या




तुम्हाला ITR २०२५ भरायचा असेल तर आता तुमचे काम अगदी सोपे झाले आहे. तुम्ही ITR घरी बसूनदेखील भरू शकता. हो. आता ही प्रोसेस आणखी सोपी झाली आहे. तुम्हाला ITR भरण्यासाठी विभागाने AIS ॲप आणि Income Tax Department ॲप सुरू केले आहे. चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घेऊया.

फायनान्शियल एक्सप्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार AIS for Taxpayer आणि Income Tax Department नावाचे हे दोन ॲप अँड्रॉइड आणि आयओएस प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. AIS for Taxpayer आणि Income Tax Department हे खास पगारदार, पेन्शनधारक आणि लहान करदात्यांसाठी डिझाइन केलेले आहे. टॅक्स भरणे अधिक सोपे करण्याच्या उद्देशाने या ॲप्सची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे करदात्यांना अर्ज भरताना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये.

करदात्यांना ॲप्समध्ये ITR दाखल करण्यासाठी आधार ID, पॅन आणि पासवर्ड टाकून लॉग इन करावे लागेल. लॉग इन केल्यानंतर, वार्षिक माहिती विवरण आणि करदाता माहिती सारांशाचा डेटा ॲपमध्येच उपलब्ध आहे. यात कंपन्या, बँका, म्युच्युअल फंड यासारख्या ठिकाणांचा प्री-फिल्ड डेटा असतो, ज्यामुळे मॅन्युअल एंट्री कमी होते. पगार, पेन्शन, भांडवली नफा किंवा इतर उत्पन्नासारख्या आपल्या उत्पन्नावर आधारित योग्य ITR फॉर्म निवडण्यात ॲप आपल्याला मदत करेल. कोणताही डेटा चुकीचा असेल किंवा गहाळ झाला असेल तर तो दुरुस्त केला जाऊ शकतो किंवा जोडला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, मुदत ठेवी किंवा भाड्याच्या उत्पन्नावरील व्याज मॅन्युअली प्रविष्ट करावे लागू शकते.

रिटर्न भरल्यानंतर आधार OTP, नेट बँकिंग किंवा ई-व्हेरिफिकेशन डिजिटल स्वाक्षरीने केले जाते. परतावा त्वरित सादर केला जाईल. यासोबतच पोचपावतीदेखील निर्माण केली जाते. ज्यांना त्यांचे फाइलिंग द्रुत आणि सुरक्षितपणे पूर्ण करायचे आहे त्यांच्यासाठी हे विशेषतः उपयुक्त आहे.

आवश्यक कागदपत्रे

- ✻ एक वैध आणि सक्रिय पॅन कार्ड, मोबाइल नंबर
- ✻ ई-मेल आयडी
- ✻ प्रत्येक पॅन कार्डसाठी स्वतंत्र नोंदणी

# साहित्य संशोधक, ग्रंथकार विनायक भावे



निमित्त

मराठी साहित्यसंशोधक आणि ग्रंथाकार तसेच महाराष्ट्र सारस्वत या प्राचीन मराठी साहित्येतिहासग्रंथाचे कर्ते अशी विनायक लक्ष्मण भावे यांची ओळख राहिली आहे. त्यांचा आज स्मृतिदिन.

विनायक भावे यांचा जन्म ६ नोव्हेंबर १८७१ रोजी कुलाबा (विद्यमान रायगड) जिल्ह्यातील पळस्पे या गावी झाला. त्यांचे मराठी व इंग्रजी शिक्षण ठाणे येथे झाले. मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून ते बीएस्सी झाले. ठाणे येथे माध्यमिक शिक्षण घेत असताना काव्येतिहाससंग्रह या मासिकाचे एक संपादक जनार्दन बाळाजी मोडक हे त्यांना मुख्याध्यापक म्हणून लाभले. त्यांचा सहवास व मार्गदर्शन यामुळे भावे यांना मराठी काव्ये वाचण्याची गोडी लागली. शालेय जीवनातच ते मराठी काव्ये आणि कविचरित्रे याविषयी निबंध लिहू लागले होते.


महाराष्ट्र सारस्वताच्या पहिल्या आवृत्तीचे लेखन त्यांनी महाविद्यालयात शिकत असतानाच केले होते. १८९३मध्ये ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाची त्यांनी स्थापना केली. १८९८मध्ये त्यांचे वडील मरण पावले. त्यानंतर वडिलांच्या मिठागरात लक्ष घालून त्यांनी मिठाचा व्यापार सुरू केला व त्यात यश मिळविले. १९१८ साली ते त्या व्यापारातून निवृत्त झाले व उर्वरित आयुष्य त्यांनी सर्वस्वी विद्याव्यासंगात घालविले.

महाराष्ट्र सारस्वत हाच भावे यांचा पहिला ग्रंथ होय. त्याची पहिली आवृत्ती विष्णू गोविंद विजापूरकर संपादित ग्रंथमाला या मासिकात क्रमशः प्रसिद्ध झाली (मार्च १८९८ ते मे १८९९). त्यानंतर या ग्रंथाच्या पाच आवृत्त्या निघाल्या (१९१९, १९२४ १९२८, १९५१, १९६३, १९८२). यापैकी तिसरी आवृत्ती दोन भागांत प्रसिद्ध झाली होती. या ग्रंथाची पहिली आवृत्ती म्हणजे केवळ ९८ पृष्ठांचा एक निबंध होता. तथापि, त्यात भावे यांनी पुढे सतत भर घातल्यामुळे तिसऱ्या आवृत्तीपर्यंत हा ग्रंथ ७४४ पृष्ठांपर्यंत वाढला. चौथा आवृत्ती अद्ययावत करण्याच्या दृष्टीने तिचे संपादक शं.गो. तुळपुळे यांनी सु. २५० पृष्ठांची एक पुरवणी तिला जोडली. पाचव्या आवृत्तीत या पुरवणीत आणखी सु. १०० पृष्ठांची भर पडली. सहाव्या आवृत्तीत या ग्रंथांची विभागणी दोन खंडांत केली आहे : पहिला खंड हा वि. ल. भावलेखित मूळ ग्रंथ असून दुसरा खंड हा शं.गो. तुळपुळे यांनी तयार केलेल्या पुरवणीचा आहे. अशा प्रकारे हा ग्रंथ वाढत गेला.

मराठी साहित्याचा १८१८पर्यंतचा इतिहास महाराष्ट्र सारस्वतात आलेला आहे. मराठी भाषेच्या मूळपीठिकेपासून आरंभ करून पेशवाईअखेरील कवीपर्यंत भावे आलेले आहेत. महानुभव संत आणि त्यांचे साहित्य यांचा परिचय महाराष्ट्र सारस्वतातून करून देऊन त्या साहित्याच्या संशोधनाच्या कामीही त्यांनी महत्त्वाची भर घातली. प्राचीन मराठी साहित्येतिहासावरील एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून आजही या ग्रंथाला मान्यता आहे.

प्राचीन साहित्याच्या संपादनाचेही कार्य त्यांनी केले. चक्रवर्ती नेपोलियन (तीन खंड, १९२१, १९२२, १९२२) हा त्यांनी लिहिलेला चरित्रग्रंथही प्रसिद्ध असून वारसा (१९७१) या नावाने त्यांचे काही स्फुट लेखन संकलित केले आहेत. महाराष्ट्र सारस्वत हा वि.ल. भावे यांचा ग्रंथ इतका गाजला की ते महाराष्ट्र सारस्वतकार म्हणून ओळखले जातात. नेपोलियनचे चरित्रही त्यांनी मराठीत आणले. पुणे येथे १२ सप्टेंबर १९२६ रोजी ते निधन पावले. (साभार : मराठी विश्वकोष)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तारुण्यातच हृदय होतेय कमजोर; विकार वाढले

एकेकाळी हृदयाचा आजार केवळ वृद्धांना व्हायचा, परंतु अलिकडील आपले रहाणीमान बदल्याने वाढता ताण-तणाव, बैठी कामाची शैली यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्याने ऐन तारुण्यात हृदयविकाराचे आजार होऊ लागले आहेत.

तिशीतच का बायपास सर्जरीची वेळ का येत आहे. यापूर्वी ५० वा ६० या वयात बायपास सर्जरीची व्हायची आता तिशीतच ही वेळ येत असल्याने जर विमा नसेल तर कुटुंबच आर्थिक संकटात सापडत आहे.



हृदयाला रक्त पुरविणाऱ्या रक्त पुरविणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज तयार झाल्यानंतर बायपास सर्जरीचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात असतो. हार्ट अटॅक आल्यानंतर किंवा हार्ट अॅटॅकच्या धोक्यापासून वाचण्यासाठी डॉक्टर बाय पास सर्जरीचा सल्ला देतात. हार्टमधील नसांमध्ये ब्लॉकेज कोलेस्ट्रॉलमुळेदेखील होत असतो तसेच रक्ताची गुठली झाल्याने देखील हृदयाचा रक्तपुरवठा बंद पडू शकतो. त्यामुळे बायपास सर्जरीचे प्रमाण खूपच वाढले आहे.

जेवणाच्या वाईट सवयी आणि बिघडलेली जीवनशैली यामुळे देखील हृदयासंबंधित आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे राजीव गांधी हॉस्पिटलचे कार्डीओजी विभागाचे डॉ.अजित कुमार यांनी म्हटले आहे. बदलती जीवन शैली, व्यायामाचा अभाव आणि धूम्रपान आणि दारूचे व्यसन यामुळे हृदय विकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे अलिकडे तिशीत हार्ट अॅटॅक येण्याचे प्रमाण खूपच वाढल्याचे गुरुग्राम येथील नारायणा हॉस्पिटलचे प्रोग्रॅम हेड कार्डियक सायन्सेसचे डॉ. हेमंत मदान यांनी म्हटले आहे.

मानसिक तणाव, अपुरी झोप याचादेखील हृदयावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे हृदयविकाराचे प्रमाण वाढले आहे. हार्टच्या आजाराविषयी लोकांमध्ये जागरुकता नाही. छातीत दुखू लागल्यावर अचानक धाप लागण्याच्या तक्रारीकडे लोक दुर्लक्ष करतात. लोकांना गॅसेस किंवा एसिडीटीचा त्रास वाटतो. परंतू याकडे दुलक्षं करू नये असे दिल्लीच्या आरएमएल हॉस्पिटलमध्ये कार्डिओलॉजी विभागातील प्रोफेसर डॉ. तरुण कुमार यांनी म्हटले आहे.

कमी वयात हार्ट अटॅक येण्याची कारणासाठी ब्लड प्रेशर देखील जबाबदार आहे. जामा जर्नलच्या साल २०२१मधील एक संशोधनात म्हटले आहे की, भारतात चारपैकी एका व्यक्तीला ब्लड प्रेशरच्या आजाराने ग्रस्त आहे. यातील ३० टक्के लोक कमी वयाचे आहेत.

# श्रीवर्धनच्या दुर्गम भागांत मोबाईल नेटवर्क नसल्याने नागरिक त्रस्त; शासकीय कामेही ठप्प



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुका भौगोलिक दृष्ट्या पाहिल्यास विविध विभागांमध्ये विभागलेला आहे. समुद्र किनारपट्टीची असलेली गावे श्रीवर्धन, दिवेआगर, आदगाव, हरिहरेश्वर, वेळास ही समुद्रा सपाटीवर आहेत. या गावांच्या काही किलोमीटर अंतरावर डोंगर आहेत. परंतु तालुक्यातील अनेक गावे व वाड्या अशा ठिकाणी आहेत की अद्यापही त्या ठिकाणी मोबाईलचे नेटवर्क उत्तम प्रमाणात उपलब्ध होत नाही. पर्यायाने नागरिकांना अत्यंत त्रास सहन करावा लागतो. अनेक गावकरी आपल्या नातेवाईकांना किंवा मुंबईला असलेल्या आपल्या मुलाला फोन करण्यासाठी एक किलोमीटर चालत दूर टेकडीवर जातात, त्यावेळी त्याला नेटवर्क उपलब्ध होते.

तालुक्यातील बोरले, रसाळवाडी, देवखोल, नागलोली, धनगर मलई या गावांमध्ये मोबाईल नेटवर्क अत्यंत कमी प्रमाणात सापडत असल्यामुळे त्या ठिकाणी इंटरनेट सेवा चालत नाही. नागलोली सारख्या गावामध्ये केंद्र शासनाचे पोस्ट ऑफिस कार्यरत आहे. परंतु या पोस्ट ऑफिसचा कारभार करणे देखील नेटवर्कच्या अभावी कठीण होऊन बसते. त्याचप्रमाणे या ठिकाणी असलेले ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी व इतर शासकीय आस्थापना किंवा त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी यांना नेटवर्क उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

या परिसरामध्ये धनगर मलई व देवखोल या दोन गावांच्या परिसरात उंच डोंगरावर भारत संचार निगमने मोबाईल टॉवर उभारलेले आहेत. परंतु हे टॉवर कायमच बंद असल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे नागरिकांनी भारतीय संचार निगमगमचे घेतलेले सिम कार्ड कोणतेही उपयोगाचे नसल्याने, जिओ कंपनीचे सिम कार्ड घेतले आहे. परंतु जिओ कंपनीचे नेटवर्क देखील त्या ठिकाणी चांगल्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे नागरिकांना फार अडचणीचे होऊन बसते. प्रशासकीय दृष्ट्या सर्व कारभार नेटवरती उपलब्ध होत असल्यामुळे नागरिकांना प्रत्येक भागामध्ये नेटवर्क उपलब्ध करून देणे शासनाची जबाबदारी आहे.

तरी प्रशासनाने या ठिकाणी चांगल्या प्रकारे नेटवर्क सुविधा उपलब्ध होईल. यासाठी त्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या टॉवर्सना पुनर्जीवित करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. जर का भारत संचार निगम कडून त्या ठिकाणी टॉवर सुरू करण्यास उपलब्धता दर्शवण्यात येत नसेल, तर खाजगी कंपनीचा टॉवर उभा करून नागरिकांना सोय करून देणे आवश्यक आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीचा सर्वांगीण विकास

**रोहा : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हा शासनाचा महत्वकांक्षी अभियान आहे.या अभियानाच्या माध्यमातून लोकसहभागातुन चळवळ उभी करुन आपण काम केल्यास मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीचा सर्वांगीण विकास साधणार असल्याचे गटविकास अधिकारी शुभा पाटील यांनी सांगितले.



ग्रामविकास व पंचायतराज विभाग, रायगड जिल्हा परिषद, रोहा पंचायत समिती यांच्यावतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय अधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य ग्रामपंचायत अधिकारी यांची तालुका स्तरीय कार्यशाळा कै.द.ग. तटकरे सभागृह येथे आयोजित करण्यात आले होते यावेळी शुभदा पाटील बोलत होत्या

या वेळी सहाय्यक गटविकास अधिकारी महादेव शिंदे, विस्तार अधिकारी महारुद्र फडतरे, विस्तार अधिकारी सुनील गायकवाड, शिर्के मॅडम,सरपंच नितीन वारंगे, जंगम मॅडम, अलका बामुगडे आदीसह तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक, शिक्षक, सह ग्रामपंचायत पदाधिकारी व पंचायत समिती अंतर्गत असलेल्या विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | ०२ जंगली, झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' खारघर, सेक्टर १९ येथील भुखंड क्र. १४ मधील प्रभाग कार्यालयाच्या समोरील बाजुस फूटपाथवर ०२ झाडे असून, इमारतीच्या प्रवेशद्वारा मध्ये वाहनांना ये जा करण्याकरीता अडथळा निर्माण करीत आहेत. |
| २ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | ०१ नारळ, झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती -'क' कामोठे येथील कामोठे गावातील मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामामध्ये ०१ नारळाचे झाड अडथळा निर्माण करीत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४४५/४५६/२०२५**
**दिनांक : ११/०९/२०२५**

**सही/-**
**उपायुक्त**
तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका


# गणेशोत्सवात डिजेमुक्त खालापूर तालुका! पोलिसांच्या आवाहनाला नागरिकांनी दिला प्रतिसाद

**चौक: प्रतिनिधी**

गणेशाचे आगमन आणि निरोप देण्यासाठी डीजे व डॉल्बी यांचा वापर न करता पारंपरिक महाराष्ट्रीयन वाद्य ढोल ताशा हलगी सनई चौघडे वाजवून गणरायाचे आगमन,निरोप द्यावा असे आवाहन खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले होते, त्यास तालुक्यातील सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ आणि ग्रामस्थ, घरगुती गणपती यांनी दिला आहे.काही धनाढ्य लोक आपले घरगुती गणपती देखील डीजे च्या तालावर आणतात. या वर्षी डिजे व डॉल्बी मुक्त गणेशोत्सवात त्याची अंमलबजावणी झाल्याने खालापूर तालुका डीजे आणि डॉल्बी मुक्त झाला आहे.

गणेश उत्सव, सार्वजनिक उत्सव, महापुरुषांची जयंती,लग्नाची वरात यात पाश्चिमात्य संगीताचा वापर सुरू झाल्याने पारंपरिक वाद्य लुप्त होण्यास सुरुवात झाली आहे. डॉल्बी, डीजे ला मोठं महत्त्व दिल जातं असल्याने त्याचा विपरीत परिणाम आरोग्यावर होऊ लागला आहे, असे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.डीजेच्या दणदणाटामध्ये मिरवणूका काढल्या जातात.यावर कार्यकर्ते बेधुंद होऊन नाचतात. मंडळं एकेमकांशी आवाजाची स्पर्धा करतात.डीजे व डॉल्बीनं तरुणाईला वेड लावलंय. डीजे व डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकताना दिसते. क्षणभराच्या या धुंदीसाठी आयुष्यभर पश्चाताप करण्याची पाळी काही जणांवर आल्याचे आपण सोशल मीडियावर, बातमी द्वारे पाहत असल्याचे दिसून आले.

डीजेमुक्तीची संकल्पना खालापूर तालुक्यातून गणेश उत्सवापासून व्हावी असा प्रयत्न करण्यास सुरूवात केली.डीजे व डॉल्बी मुक्तीची जागरुकता निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. सार्वजनिक कार्यक्रमात डीजे मुक्तीसाठी संदेश देणे आवश्यक असून तसे बॅनर लागले पाहिजेत.डीजेच्या आवाजामुळे बहिरेपणा येण्याचे प्रमाण वाढत आहे.मागील चार वर्षांपासून या प्रकारातील रुग्णांची संख्या वाढतीय.माणसाचे कान ८० डेसिबल पर्यंत चा आवाज सहन करु शकतात .त्या पुढील आवाज कान सहन करु शकत नाहीत, अशी माहिती दिली.

त्याच बरोबर डीजे किंवा डॉल्बीच्या आवाजामुळे अनेक रुग्णांना कानाचा बहिरेपणा,डोळ्याला अंधत्व आणि हृदयाचे आजार निर्माण झाल्याचं समोर आले आणि त्यामुळेच सर्व सण,उत्सव आता डीजे मुक्त करून पारंपरिक वाद्य ढोल,ताशा, हलगी, सनई चौघडे वाजायला सुरुवात झाल्यास लुप्त झालेली वाद्य संस्कृती पुन्हा नवीन पिढीला अवगत होईल.

गणेशोत्सवादरम्यान पारंपरिक नाच झिम्मा फुगडी या गायब होताना दिसत आहेत, गौरी गणपती समोर रात्रभर चालणाऱ्या पारंपरिक कार्यक्रमांऐवजी, पश्चिमात्य गाणी ऐकण्यास मिळतात, त्यामुळे पारंपरिक संस्कृती हरवतेय की काय? याची भीती वाटत आहे.गणपतीसमोर भजन-आरती, महिलांच्या फुगड्या आणि ओव्या या गणेशोत्सवाचा अविभाज्य भाग आहे. आपल गावपण टिकवण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, भाद्रपद महिन्यात गौऱ्या गणपती,अथवा साखरचोत गणपती बसविण्याची पद्धत आहे,लवकरच नवरात्री उत्सव सुरू होईल, त्याही वेळेस पारंपरिक पद्धतीने वाद्य वाजवून देवीचे आगमन करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.

# मध्य रेल्वेने विनातिकीट प्रवाशांकडून केला १०० कोटींहून अधिक रुपये दंड वसूल

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने आपल्या प्रवाशांना सुरक्षित, सुरळीत आणि आरामदायी प्रवास अनुभव देण्याच्या अढळ बांधिलकीत, अनधिकृत आणि विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी आपले प्रयत्न वाढवले आहेत. जोरदार आणि नियमित तिकीट तपासणी मोहिमांद्वारे, रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते ऑगस्ट २०२५) दरम्यान लक्षणीय परिणाम साधले आहेत.

या काळात, मध्य रेल्वेच्या समर्पित तिकीट तपासणी टीमने तिकीटाशिवाय, अयोग्य तिकीटासह किंवा अवैध प्रवास करणाऱ्या १७.१९ लाख प्रवाशांना ताब्यात घेतले आणि विक्रमी दंड रु.१००.५० कोटी वसूल केला.

ऑगस्ट २०२५ महिन्यात, मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी टीमने २.७६ लाख प्रवाशांना विनातिकीट/वैध तिकीटाशिवाय प्रवास करताना ताब्यात घेतले, जे ऑगस्ट २०२४ मधील २.३४ लाख प्रवाशांशी तुलना करता १८% वाढ दर्शवते.

ऑगस्ट २०२५ मध्ये विनातिकीट/वैध तिकीटाशिवाय प्रवास करणाऱ्यांकडून रु.१३.७८ कोटी दंड वसूल केला गेला, तर ऑगस्ट २०२४ मध्ये या दंडाची रक्कम रु८.८५ कोटी होती, यामुळे ५५% पेक्षा जास्त वाढ दिसून येते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते ऑगस्ट-२०२५) साठी विनातिकीट/वैध तिकिटाशिवाय प्रवास करताना पकडलेल्या प्रवाशांची विभागवार माहिती आणि त्यांच्याकडून वसूल केलेल्या दंडाची रक्कम पहाता भुसावळ विभागात ४.३४ लाख प्रकरणांमधून ३६.९३ कोटी रुपये, मुंबई विभागात ७.०३ लाख प्रकरणांमधून २९.१७ कोटी रुपये, नागपूर विभागात १.८५ लाख प्रकरणांमधून ११.४४ कोटी रुपये, पुणे विभागात १.८९ लाख प्रकरणांमधून १०.४१ कोटी रुपये, सोलापूर विभागात १.०४ लाख प्रकरणांमधून ५.०१ कोटी रुपये आणि मुख्यालयात १.०४ लाख प्रकरणांमधून ७.५४ कोटी रुपये एवढी आहे.

मध्य रेल्वे अनधिकृत प्रवाशांना शोधण्यासाठी बहुआयामी धोरण अवलंबते ज्यामध्ये स्टेशन तपासणी, ॲम्बुश तपासणी, किल्ल्याची तपासणी, सघन तपासणी आणि मेगा तिकीट तपासणी मोहिमा समाविष्ट आहेत. ही कारवाई मेल/एक्सप्रेस गाड्या, प्रवासी गाड्या, विशेष गाड्या तसेच मुंबई आणि पुणे विभागातील उपनगरीय गाड्यांमध्ये केली जाते.

तिकीट फसवणूक रोखण्यासाठी आणि महसूलाची हानी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत णढड मोबाइल ॲपद्वारे स्थिर टठ कोडने तिकीट बुकिंग थांबवली आहे, कारण प्रवाशांकडून त्याचा व्यापक गैरवापर झाल्याचे अहवाल प्राप्त झाले होते. टठ कोड प्रणाली बंद केल्यामुळे पेपरलेस तिकीटिंगच्या गैरवापरीवर आता नियंत्रण आले आहे.

मध्य रेल्वे द्वारे प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, योग्य आणि वैध तिकीट खरेदी करून सन्मानपूर्वक आणि जबाबदारीने प्रवास करावा, जेणेकरून असुविधा आणि दंड टाळता येईल. रेल्वे तिकीटशिवाय प्रवासाबाबत शून्य-सहनशील धोरण पुनरावृत्त करते आणि प्रवाशांना आरामदायी व सन्मानपूर्वक प्रवास सुनिश्चित करण्यास कटिबद्ध राहते.


वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर



## महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**रायगड अलिबाग यांचे कार्यालय**

कॉंग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा. क्र. जिउनि/गृह/मोफा क. ११/मा. अभि./जाहीर नोटीस /सन २०२५ दिनांक :- ०९/०९/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार संस्था साईकृपा सुकापूर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सुकापूर, पाली देवद, प्लॉट नं.१, गट नं. २१. हिस्सा नं.३ (प).१ (२) (४), ता. पनवेल, जि. रायगड यांनी १. श्री विठ्ठल गंगाराम शेरखाने (मयत) विकासक व जमीनमालक, यांचे वारस १.१गोदाबाई विठ्ठल शेरखाने, १.२ शिवाजी विठ्ठल शेरखाने, १.३ मुकुंद विठ्ठल शेरखाने, १.४ अनिल विठ्ठल शेरखाने, १.५ आरती अतिन कांबळे, वरील सर्व रा. पनवेल माथेरान रोड, तेजस बियर शॉप जवळ, सुकापूर, पाली देवद ता. पनवेल, जि. रायगड यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**पाली देवद, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग-२१/अ/३/२/ब/१/२/४/प्लॉट नं.१, क्षेत्र ३४१चौ.मी.,**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २३/०९/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ०९/०९/२०२५

**सही/-**
**(प्र. का. जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**



## Tender Notice

MAHAVITARAN

Following Tender is invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/e-Tender/T-06/2025-26 | Work contract for work of Repair / Reconditioning Crimping of 22 KV HT Line jumpers at cut point using hydraulic crimping machine under Goregaon Division. | 10,000/- | 1000+18 %GST= 1180/- |
| 2 | EE/GRN/e-Tender/PM-HT/T-07/2025-26 | Preventive Maintenance of HT overhead lines and underground cables under Goregaon Division under Pen Circle. | 50,000/- | 5000+18 %GST= 5900/- |
| 3 | EE/GRN/e-Tender/PM-LT/T-08/2025-26 | Preventive Maintenance of LT overhead lines and underground cables under Goregaon Division under Pen Circle. | 50,000/- | 5000+18 %GST= 5900/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in & can be downloaded from Dt. 11.09.2025 to Dt. 21.09.2025. Contact Person- Addl. Executive Engineer Mob no- 7875765592 MSEDCL Ltd. Chinchvali, Goregaon Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO No. 237** **Executive Engineer, Goregaon Division**



## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दि. १२/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नावः **अरिहंत अनाईका फेज २ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड.** सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १३/०९/२०२५ ते १८/०९/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक १९/०९/२०२५, नामनिर्देशन माघारी दि. २१/०९/२०२५ ते ०५/१०/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान दि. १२/१०/२०२५ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात, निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, **अरिहंत अनाईका फेज २ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड.** कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

**सही/-**
**संदेश नंदकुमार महाडीक**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**प्राधिकृत अधिकारी, कोकण विभाग**
**पॅनल अ.क्र. वर्ग 'क' ०६/'ई' ०९**
**अरिहंत अनाईका फेज २ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड.**



## वार्षिक सर्वसाधारण सभा वर्ष २०२४-२५

संदर्भ क्रमांक: NVPH1/GBM/08 तारीख:- ०७/०९/२०२५

निलकंठ विश्व फेज १ को.ऑप. हौ. सो.लि.या सोसायटी ची सातवी वार्षिक सर्वसाधारण सभा २८/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता सोसायटीच्या आवारात खाली दिलेल्या विषय पत्रिकेनुसार आयोजित केली आहे.

**सभेपुढील विषय :-**

१. २५/०८/२०२४ रोजी झालेल्या सहाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि मंजूर करणे.
२. लेखापरीक्षण, सुधारणा अहवाल आणि त्यावरील समितीने केलेल्या कार्यवाहीसह ताळेबंद, उत्पन्न आणि खर्च यांचा समावेश असलेल्या खात्यांचे लेखापरीक्षित विवरण मंजूर करणे आणि स्वीकारणे.
३. पुढील आर्थिक वर्षासाठी विचारार्थ म्हणून २०२५-२६ चा वार्षिक अर्थसंकल्प सभेसमोर ठेवणे (संदर्भासाठी जोडला आहे).
४. आर्थिक वर्ष २०२५-२६ चे वैधानिक लेखापरीक्षण करून घेण्यासाठी राज्य सरकारने मान्यता दिलेल्या अधिकृत यादीमधील लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
५. पहिल्या सर्वसाधारण सभेमधील पूर्वीच्या मंजूर ठरावांमध्ये सुधारणा/प्रस्ताव मंजूर करणे.
६. लिकेज तक्रारी, इमारतीच्या बांधकामाला होणारा वाढता धोका आणि त्यावरील उत्तरोत्तर वाढत जाणारा खर्च लक्षात घेता टेरेस वर छत टाकण्याबाबत चर्चा करणे.
७. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय व त्यावरील चर्चा.

**टीप :-**

१. सदस्यांना विनंती आहे की, त्यांच्या शंका असल्यास, लिखित स्वरूपात किंवा सोसायटीच्या ईमेलवर (neelkanthvishwap1@gmail.com) १४ सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावा, ज्यामुळे त्यांच्या प्रश्नांच्या स्पष्टीकरणासाठी माहिती गोळा करणे सुलभ होईल.
२. फक्त मूळ सदनिका धारक आणि त्यांच्या अनुपस्थितीत सह-सदनिका धारक यांना सभेला उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल. कोणत्याही प्रतिनिधि ला उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**सही/-**
**मा. सचिव**
**निलकंठ विश्व फेज १को.ऑप.हौ. सो.लि.**
**सर्व्हे नं १३९/१४० उसर्ली खूर्द, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**


# नवोदय अकरावी निवड परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**माणगाव : बातमीदार**

पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर, तालुका माणगाव,जिल्हा रायगडच्या सन २०२६ -२०२७ करिता इयत्ता अकरावी (विज्ञान शाखा) निवड परीक्षेचे ऑनलाईन अर्ज https://cbseitms.nic.in/2025/nvsxiš11 या संकेतस्थळावर सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. चालु शैक्षणिक वर्षांत ईयत्ता दहावीत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी या परिक्षेस अर्ज करु शकतात. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख २३ सप्टेंबर २०२५ पर्यंत आहे. परीक्षा दिनांक ०७ फरवरी २०२६ रोजी जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे होणार आहे. तरी रायगड जिल्ह्यातील सर्व परीक्षार्थी, पालक, सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांनी याची नोंद घ्यावी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल करावे असे आवाहन डॉ. प्रशांत राघमवार प्राचार्य ,जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर, रायगड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शारदा अहिरे मॅडम ७०२०६१४०६९, रश्मी मिश्रा मॅडम - ९०११७३८०४०, संतोष चिंचकर सर ९८८१३५१६०१ यांना संपर्क साधावा.

# निर्माल्यापासून होणार खतनिर्मिती

## गणेशोत्सवामधील उपक्रमातून नमुंमपा उद्याने फुलवणार

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री गणेशोत्सव विसर्जन कालावधीत एकूण ६३.६९५ टन इतके निर्माल्य जमा झाले. हे निर्माल्य स्वतंत्र वाहनाव्दारे तुर्भे प्रकल्पस्थळी नेण्यात आले असून त्यावर शास्त्रोक्त खत निर्मिती प्रक्रिया केली जात आहे. यामधून उद्याने फुलविली जाणार असल्याचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले

२७ ऑगस्टपासून अत्यंत उत्साहात संपन्न झालेला श्रीगणेशोत्सव नवी मुंबईकर नागरिकांनी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी 'पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव' साजरा करावा अशा केलेल्या आवाहनास चांगला प्रतिसाद देत पर्यावरणशील दृष्टीने साजरा केला.

यामध्ये शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करणा-या नागरिकांना 'पर्यावरणमित्र' म्हणून प्रशस्तिपत्र देउुन गौरविण्यात आले. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा मान राखून नागरिकांनी मोठया संख्येने ६ फूटापेक्षा कमी उंचीच्या श्रीगणेशमूर्तींचे १४३ इतक्या मोठ्या संख्येने विभागवार बनविलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये विसर्जन करुन पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनासाठी




योगदान दिले.

याचप्रमाणे श्रीमूर्तीसोबत विसर्जनस्थळी आणले जाणारे निर्माल्य ओले व सुके अशा वेगवेगळ्या निर्माल्य कलशातच टाकावे या आवाहनालाही नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. श्रीगणेशोत्सवातील चार विसर्जन दिवसांमध्ये २२ नैसर्गिक व १४३ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ठेवलेल्या निर्माल्य कलशात ६३ टन ६९५ किलो इतके निर्माल्य जमा झाले. हे निर्माल्य संकलित करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने स्वतंत्र निर्माल्य वाहतुक वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून सर्व स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांनी स्वच्छताकर्मींसह नियोजनबध्द रितीने ही निर्माल्य संकलन मोहीम नियोजनबध्दरित्या राबविली.

गणेशोत्सवात श्रीमुर्तीसोबत विसर्जनस्थळी येणा-या पुष्पमाळा, फुले, दुर्वा, तुळस, शमी, फळांच्या साली-तुकडे यासारखे पुनर्प्रक्रिया करण्यायोगे 'ओले निर्माल्य' तसेच मुर्तीच्या गळ्यातील कंठी, सजावटीचे सामान असे 'सुके निर्माल्य' ठेवण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने वेगवेगळ्या निर्माल्य कलशांची व्यवस्था करण्यात आली होती.

अशा प्रकारे ओले व सुके निर्माल्य वेगवेगळ्या कलशात ठेवण्याच्या संकल्पनेला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे यावर्षीच्या श्रीगणेशोत्सव विसर्जन कालावधीत गौरींसह सातव्या दिवसाच्या विसर्जनाप्रसंगी सर्वाधिक २४.४४० टन तसेच दीड दिवसांच्या विसर्जनदिनी १४.२०५ टन निर्माल्य आणि अनंतचतुर्दशीदिनी दहाव्या दिवसाच्या विसर्जनप्रसंगी १४.०७० टन निर्माल्य संकलित करण्यात आले.

# घणसोली आणि कोपरखैरणे येथे अतिक्रमणावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत अतिक्रमण विभागाने घणसोली व कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली कार्यक्षेत्रातील घर क्रमांक-१६६, रबाळे, साळवीनगर येथे नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे काम सुरू होते. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहुन हटविणे आवश्यक होते, परंतु सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

सदरच्या ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेने तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम पाच ब्रेकर, १५ कामगार व एक गॅस कटर यांच्या सहाय्याने निष्कासन कारवाई करण्यात आली.

या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त उत्तम खरात, कनिष्ठ अभियंता प्रविण विश्वे, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, सिडको अधिकारी व कर्मचारी तसेच नवी मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी व पोलिस पथक तैनात होते. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत शालिक हल्ल्या नाईक घर नं ११२३, कुकरेजा रुबीच्या मागे, सेक्टर १२D, रामनगर, बोनकोडे, कोपरखैरणे यांच्या बांधकामास नोटीस बजावण्यात आली होती. बांधकामावर निष्कासनाची अंशतः तोडक कार्यवाही करण्यात आली.

या अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर कर्मचारी व न.मुं.म.पा पोलीस तसेच सदर कारवाईसाठी नऊ मजूर, इलेक्ट्रॉनिक हॅमर, पिकअप व्हॅन, गॅस कटरचा वापर करण्यात आले.

## हवामानातील दमटपणामुळे आजार वाढले

■ बदलत्या वातावरणाचा आरोग्यावर परिणाम

**मुंबई : प्रतिनिधी**

सप्टेंबरच्या सुरुवातीला साधारणपणे पावसाचा जोर कमी होतो, मात्र यंदा पावसाने अजूनही माघार घेतलेली नाही. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार पाऊस सुरू असल्याने हवेतील दमटपणामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत.

हवामानातील दमटपणामुळे डेंग्यू, मलेरिया, सर्दी-खोकला आणि पोटाचे विकार यांसारखे आजार झपाट्याने वाढ होऊ शकते. मागील पंधरवड्यातील तुलनेत विविध आजार वाढले असून, पालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये रुग्ण उपचारासाठी येत आहेत. खासगी दवाखान्यांत तशीच स्थिती आहे.

वैद्यकीय अधिकारी म्हणाले की, सततच्या पावसामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होते.



नागरिकांनी उघड्या पाण्यात जाणे टाळावे, उकळलेले पाणी प्यावे आणि डासांपासून बचावासाठी काळजी घ्यावी. उकळलेले पाणी प्यावे, ताजे अन्नच सेवन करावे, ताप, अंगदुखी किंवा उलटी यासारखी लक्षणे दिसताच तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

लांबलेल्या पावसामुळे निर्माण झालेले आजारी वातावरण सध्या मोठे आव्हान बनले आहे. पावसाची साथ आणि आजारांचा धोका टाळण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता व आरोग्य नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

## तोंडाच्या कर्करोग तपासणीचे मोफत शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली येथील डॉ. प्रीतीज पॉलीक्लिनिकतर्फे तोंडाच्या कर्करोगाचे लवकर निदान आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी ५ दिवसांचा तोंडाचा कर्करोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन अंधेरी न्यायालयाच्या मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट शैलजा पांडे आणि कल्याण न्यायालयाच्या ॲड. दीपक मिश्रा यांनी केले. या वेळी कानीफ बांगर उपस्थित होते.

शिबिरादरम्यान तपासणी केलेल्या रुग्णांना पीएसएम असोसिएशन फॉर एज्युकेशन अँड सोशल वेलफेअर अंतर्गत सरकारी योजना (योजना) अंतर्गत पुढील मूल्यांकन आणि उपचार दिले जातील, जिथे शस्त्रक्रिया, रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी - सर्व उपचार पद्धतीबाबत माहिती देण्यात आली. रुग्णांची तपासणी करून त्यांना औषधोपचारांबाबत, घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# गुणवंत विद्यार्थी आणि सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या कलावंतांचा आवरे येथे सत्कार

**उरण : बातमीदार**

शिक्षणप्रेमी कै. विठाबाई शिवराम म्हात्रे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सांस्कृतिक वारसा जपणारे कलाकार यांचा विशेष गुणगौरव कार्यक्रम आवरे गावातील प्रसिद्ध अंनतभूवन सभागृहात पार पडला.

उत्कृष्ट कलाकार सम्राट नित्यानंद म्हात्रे यांनी सी बी एस सी परीक्षेत विशेष नैपुण्य मिळवल्याबद्दल तसेच कौस्तुभ आल्हाद म्हात्रे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत रायगड जिल्ह्यात सतरावा क्रमांक मिळवल्याबद्दल या दोन्ही गुणवंतांचा सत्कार उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व श्रीफळ देऊन करण्यात आला. तसेच



आवरे गावातील सांस्कृतिक वारसा जपणारे कलाकार यांचा विशेष गौरव कारण्यात आला या प्रसंगी गणेशप्रसाद गावंड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत कुठल्याही प्रकारची कला आपल्या सोबत जोपासावी व प्रगती करावी. सत्कारमूर्ती सम्राट नित्यानंद म्हात्रे याने आपले मनोगत व्यक्त करत आपल्याला भविष्यात शास्त्रज्ञ या क्षेत्रात काम करायचं आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रायगड भूषण संगीत विशारद शिवभक्त गणेश प्रसाद गावंड हे होते.यावेळी प्रभाकर म्हात्रे,एच के गावंड, प्रभाकर गावंड, पद्माकर म्हात्रे,महेश म्हात्रे, डी ए गावंड, देविदास म्हात्रे, प्रियांका म्हात्रे,जगदीश गावंड, विलास म्हात्रे, संजय गावंड,पद्माकर म्हात्रे आदी मान्यवर होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक एम एस म्हात्रे यांनी तसेच स्वागत गीत नरेश गावंड व आभार प्रदर्शन डी ए गावंड यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजन सेवानिवृत्त आदर्श शिक्षक व केंद्रप्रमुख एम एस म्हात्रे यांनी केले. या प्रसंगी आवरे ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरेंचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंच इंडियन ऑइल आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने साक्षरता दिनाच्या औचित्याने वृक्ष संवर्धन साक्षरता दिन साजरा करण्यात आला. या अभियान अंतर्गत माझे झाड या अभियानाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते व आमदार विक्रांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या वेळी इंडियन ऑइल कंपनीचे उच्चपदस्थदेखील उपस्थित होते.

उच्चपदस्थ व्हिडीओ





कॉन्फरन्स सुरू असल्यामुळे आयुक्त मंगेश चितळे या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत, परंतु त्यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागाने अत्यंत काटेकोर पद्धतीने नियोजन केल्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. त्यामुळे पनवेल तालुका पत्रकार मंचच्या वतीने अध्यक्ष मंदार दोंदे,खजिनदार संजय कदम, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, सरचिटणीस हरेश साठे आणि सदस्य प्रवीण मोहोकर यांच्या शिष्टमंडळाने आयुक्त चितळे यांना शाल प्रदान करून माझे झाड या अभियानाचे सन्मानचिन्ह भेट दिले.

याशिवाय या कार्यक्रमाला येण्याची तीव्र इच्छा असूनदेखील ईद-ए-मिलादनिमित्त निघालेल्या जुलूससाठी पोलीस बंदोबस्ताचे पर्यवेक्षण करणारे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांनादेखील सन्मानित करण्यात आले.

# युईएस कॉलेजमध्ये टीचर्स डे उत्साहात

**उरण : वार्ताहर**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांचा जन्मदिवस. हा दिवस संपूर्ण भारतभर टीचर्स डे म्हणून साजरा केला जातो. म्हणूनच हया दिवसाचं औचित्य साधून प्राचार्यांच्या तसेच सर्व विभागातील पर्यवेक्षिकांच्या व विदयार्थ्यांच्या हस्तेडॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांच्या तसबिरीस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. नंतर काही विदयार्थ्यांची भाषणेही झाली.

यु. ई. एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ण्ड कॉमर्स अ‍ॅण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी मध्ये वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली १०वीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १ली ते ९वीच्या विद्यार्थ्यांना तर १२वीच्या विद्यार्थ्यांनी ११वीच्या विद्यार्थ्यांना तसेच टी.वाय.बी. एस्सी.आय.टी.च्या विद्यार्थ्यांनी एफ. वाय. आणि एस.वाय. बी.एस्सी.आय.टी. च्या विद्यार्थ्यांना तर टी.वाय.बी.कॉमच्या विद्यार्थ्यांनी एफ.वाय. आणि एस.वाय. बी.कॉमच्या विद्यार्थ्यांना शिकविले. शिक्षकांचं कार्य किती निःस्वार्थ आणि महान असतं ह्याचा प्रत्यय, शिक्षक बनून शिकवणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला नक्कीच



आला असेल.

या कार्यक्रमाला यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, मानद सचिव ॲड. राजेंद्र भानुशाली, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका आणि समन्वयक उपस्थित होते. त्यानंतर प्रत्येक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ह्या सर्वांना श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

# रोटरी पनवेल सेंट्रलच्या सहयोगाने पैठणी प्रदर्शन व विक्री

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल च्या सहयोगाने येवला येथील सुप्रसिद्ध सोनी पैठणी चे प्रदर्शन व विक्री.विविध अंगांनी व रंगाने नटलेल आपल पनवेल व त्यात वास्तव्य करणारी अठरा पगड जातीची माणसे. प्रत्येकाच्या मनात एकच ध्यास तो म्हणजे संस्कृती जपत पनवेलचा विकास. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल गेली ३५ वर्षे समाजाकरीता आपुलकीने व जबाबदारीने आपली भूमिका बजावत अनेक लोकाभिमुख समाजोपयोगी उपक्रम पनवेल व आजूबाजूच्या परिसरात राबवले आहेत

समाजाचे लोकाभिमुख उपक्रम राबवताना समाजातील लोकांच्या सहभागातून निधी उपलब्ध व्हावा. त्या करिता असाच एक उपक्रम म्हणजे पैठणी प्रदर्शन. रायगड, पनवेल, नवी मुंबईच्या महिलांच्या विनंतीपूर्वक मागणी नुसार रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल या क्लब



ने येवला येथील १६५ वर्षांची परंपरा असलेल्या सोनी पैठणी प्रदर्शन व विक्री महोत्सव दि. १२,१३ व १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत विरुपक्ष मंगल कार्यालय अशोक बागे समोर रत्नाकर खरे मार्ग, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे.

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ने गेल्या ३५ वर्षांत डॉ. गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वैशिष्ट्य पूर्ण प्रकल्प यशस्वी केले आहेत. त्यामध्ये पर्यावरण पूरक गणेश विसर्जन वडाळे तलाव,रोटरी घनदाट जंगल प्रकल्प व रोटरी बाल उद्यान, आदिवासी विभाग तील कोंबल टेकडी जल प्रकल्प, अनेक शाळांना हॅपी स्कूल बनवणे, अनेक शाळांना वॉटर प्युरिफायर, टॉयलेट ब्लॉक्स, मुलींकरिता सॅनिटरी नॅपकिन डिस्पोसबल मशीन बसवले. नविन जन्म झालेल्या बालकांसाठी वॉरमर (Incubator), कॅन्सर पेशंट्स करिता केमोथेरपी सेंटर, उपजिल्हा रुग्णालयात अनेक उपकरणे व औषधे उपलब्ध करून देण्यात आली. लवकरच पनवेलमध्ये बटरफ्लाय गार्डन बनवणे हा प्रकल्प हाती घेणार आहोत.



**मुंबई : मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम कला दिग्दर्शक देवदास भंडारे यांच्या कल्पनेतून तयार झालेल्या कलाचित्रांच्या प्रदर्शनाचे वरळी येथील नेहरू सेंटर कला दालन येथे ९ ते १५ सप्टेंबर येथे रसिकांसाठी आयोजन करण्यात आले असून आज त्याचे चित्रपट अभिनेता रणजीत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी चित्रपट ध्वनिमुद्रक प्रशांत नांदगावकर, चित्रपट विश्लेषक दिलीप ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रदर्शनास दररोज काही सेलिब्रिटीज भेट देणार आहेत.**

# पोलादपूर येथील प्राथमिक शाळा नगरपंचायतीकडे वर्ग करण्याची गरज

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला तरी अद्याप प्राथमिक शाळेचे नगरपंचायतीकडे हस्तांतरण झाले नाही. त्यामुळे मुलांची प्राथमिक शाळा आणि कन्या शाळांच्या एकत्रित इमारतीमध्ये विद्यार्थी पटसंख्या घटून खासगी शाळांकडे पटसंख्या वाढविण्याचा कल दिसून येत आहे.



अशातच शाळेच्या इमारतीते असलेल्या अंगणवाडीला इमारतीबाहेर काढण्यासाठी मुख्याध्यापिकेने लेखी पत्राने सूचना बजावून शासनाच्या जीआरला शाळा व्यवस्थापन समितीच्या ठरावाने केराची टोपली दाखविली आहे.

रायगड जिल्ह्यात ३१५१ अंगणवाडी केंद्र असून त्यापैकी २४५४ केंद्रांसाठी इमारत उपलब्ध आहे. ६९७ अंगणवाडी केंद्रांना इमारतीअभावी भौतिक सोयी सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. या अंगणवाडी केंद्रातून सहा महिन्यांपासून सहा वर्षांपर्यंतच्या बालकांचे पोषण व आहार, आरोग्य तसेच पूर्व प्राथमिक शिक्षण यासारख्या सेवा पुरविल्या जातात. गर्भवती आणि स्तनदा मातांना पौष्टीक आहार व आरोग्य सल्ला, ग्रामीण महिलांना आरोग्य आणि आहाराबद्दल जागरूक करणे, गर्भनिरोधक सेवांबद्दल माहिती व सल्ला पुरविणे आदी कामे केली जातात.

पोलादपूर तालुक्यात ३ ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये प्रवेश घेण्यास पात्र बालकांची संख्या ५६९ एवढी असून एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत तालुक्यातील ग्रामीण भागात ११८ अंगणवाडी केंद्र आहेत. यापैकी स्वत:च्या इमारतीमध्ये ८८ अंगणवाडी केंद्र भरत असून प्राथमिक शाळेमध्ये १६, समाजमंदिरामध्ये पाच आणि खासगी इमारतीमध्ये नऊ अंगणवाडी केंद्र आहेत. म्हणजेच ३० अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या इमारती नाहीत.

पोलादपूर शहराच्या ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये झाल्यानंतर गेल्या वर्षापासून अंगणवाडी केंद्रातून नगरविकास विभागाच्या सूचनेनुसार बालकांचा आणि स्तनदा मातांचा पोषण आहार पाठविला जात आहे, तर ग्रामीण भागामध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या निकषांनुसार आहार सुरू आहे. ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला तरी अद्याप प्राथमिक शाळेचे नगरपंचायतीकडे हस्तांतरण झाले नसल्याने मुलांची प्राथमिक शाळा आणि कन्या शाळेच्या २०१३मध्ये एम्पथी फाऊंडेशनतर्फे बांधण्यात आलेल्या सुसज्ज आणि प्रशस्त एकत्रित इमारतीमध्ये शहराची एक अंगणवाडी सुरू करण्यात आली आहे.

यासाठी पूर्वी आयुक्तांचे पत्र प्रमाण मानले जात होते, तर याबाबत २ जुलै २०२५ रोजी महिला बालविकास विभागातर्फे परिपत्रकाद्वारे एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील ज्या अंगणवाडी केंद्रांना स्वत:ची इमारत उपलब्ध नाही अशी अंगणवाडी केंद्र नजीकच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये स्थलांतरीत करण्याबाबत शासन निर्णय झाला आहे.

पोलादपूर येथील उच्च प्राथमिक शाळेच्या बहुतांशी विद्यार्थ्यांच्या पालकांना शहरातील अन्य खासगी शाळांमध्ये दाखल होण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यासाठी नेहमीच प्रयत्न केले असल्याने मुलांची शाळा आणि कन्या शाळेची विद्यार्थी पटसंख्या नगण्य आहे, मात्र या प्राथमिक शाळांसाठी शाळा व्यवस्थापन समिती असून ऑगस्ट २०२५मध्ये या समितीने शासन निर्णयाविरोधात ठराव करून अंगणवाडी सेविका यांना लेखीपत्राद्वारे अंगणवाडी भरण्याची स्वतंत्र व्यवस्था प्रशासनामार्फत करण्याची सूचना करताना केंद्रप्रमुख यांच्यासाठी एक वर्ग खोली तसेच बालवाचनालयाच्या उपक्रमासाठी वर्गखोली लागणार असल्याचे कारण पुढे केले आहे.

# श्री सदस्यांनी पेणमध्ये सात टन निर्माल्य केले गोळा

## खतनिर्मिती होणार

**पेण : प्रतिनिधी**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या वतीने श्री सदस्यांनी पेण शहरासह तालुक्यातील गणेश विसर्जन ठिकाणांहून सात टन निर्माल्य गोळा करण्यात आले. या निर्माल्यापासून खत निर्मिती केली जाणार आहे.



रेवदंडा येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण व संगोपन, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी शिबिर, प्रौढ साक्षरता वर्ग, तलावातील गाळ काढणे, विहीर पुनर्भरण आदी विविध सामाजिक कार्य केले जात आहेत. याबरोबरच गणेश विसर्जनवेळी निर्माल्य तलाव अथवा नदीत सोडण्यात येत असल्यामुळे प्रतिष्ठानच्या वतीने गणेश विसर्जनावेळी निर्माल्य गोळा करून त्याच्यापासून खत निर्मिती करण्याचा उपक्रम मागील काही वर्षांपासून हाती घेण्यात आला आहे.

या वर्षी पेण शहर व तालुक्यातील दीड दिवसांचे १९७६, पाच दिवसांचे ४१०४ व गौरी मूर्ती ७०५, तर अनंत चतुर्दशीच्या दिवशी ८४४ बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. या वेळी डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांच्या वतीने पेण शहर व तालुक्यातून सात टन १११ किलो निर्माल्य गोळा करण्यात आले. यासाठी पेण शहरातील व तालुक्यातील वाशी नाका, वाशी, रावे, वरवणे, वरसई, सापोली, धावटे, आंबिवली, जिते, हनुमानपाडा, दादर, शिर्की, वडखळ, भाल या गावाच्या अंतर्गत येणाऱ्या बैठकांतील ८७७ श्री सदस्य सहभागी झाले होते. या गोळा केलेल्या निर्माल्यापासून सेंद्रीय खत तयार करण्यात येणार आहे.

# देवळे येथे महिला बचत गटांना कर्जवाटप





**पोलादपूर : प्रतिनिधी**

शासनाकडून पोलादपूर तालुक्यातील देवळे आणि लोहारे जिल्हा परिषद प्रभागांतर्गत राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियानांतर्गत यंदा प्रथमच महिला बचत गटांना विविध उद्योग व्यवसायांसाठी अनुदान दिले जात आहे. या अनुदानाचा व्याजदर केवळ एक टक्का असून पहिले कर्ज फेडल्यानंतर दुसऱ्या कर्जाची दुप्पट रक्कम मिळविता येते. तसेच उत्पादनांसाठी रोहे व महाड येथे बाजारपेठ मिळण्यासाठी विक्री केंद्र उभारण्याची ग्वाही राज्याचे रोजगार हमी योजना, खारजमीन आणि फलोत्पादनमंत्री भरत गोगावले यांनी येथे दिली.

पोलादपूर शहरातील श्रीदेवी गंगामाता सभागृहामध्ये एकता महिला प्रभाग संघ देवळे अंतर्गत महिला बचत गटांच्या मेळाव्यामध्ये कर्ज व अनुदानाचे धनादेश वाटप करण्यासंदर्भात आयोजित कार्यक्रमात मंत्री गोगावले बोलत होते.

व्यासपीठावर गटविकास अधिकारी दिप्ती गाट, तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे, माजी जि.प. उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, माजी सभापती अनिता कुंभार, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, कृउबा संचालक लक्ष्मण मोरे, महिला तालुका संघटका सुवर्णा कदम, नगराध्यक्ष शिल्पा दरेकर, नगरसेविका अस्मिता पवार, भाजप मंडळ अध्यक्ष वैभव चांदे, उद्योजक रामदास कळंबे आदी उपस्थित होते. या वेळी महाराष्ट्र शासनाच्या उमेद अंतर्गत विविध महिला बचत गटांसाठी अनुदान कर्ज वाटप करण्यात आले.

गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी, देवळे प्रभागातील महिला बचत गटांनी या कार्यक्रमासाठी चहाचा कपदेखील स्वत:च्या कष्टातून निर्माण केलेल्या उत्पन्नाच्या खर्चातून केल्याबद्दल अभिमान व्यक्त केला.

माजी जि.प. उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी, येत्या १३ सप्टेंबर रोजी बालाजी हॉटेलमध्ये वसंत हंकारे यांचे व्याख्यान असून येथे जमलेल्या माता भगिनींनी आपल्या लेकीबाळींसोबत मोठ्या संख्येने उपस्थित राहून संस्कारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## पाली अंबा नदीपात्रात मृतदेह

**पाली : प्रतिनिधी**

पाली येथे अंबा नदी पुलाजवळील पात्रात गुरुवारी (दि.११) सकाळी एका अनोळख्या व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. या संदर्भात पाली पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली लागलीच अधिकारी व कर्मचारी त्या ठिकाणी पोहचले व पंचनामा करून मृतदेह त्यांनी ताब्यात घेतला. या अज्ञात व्यक्तीचे वय साधारण ५० ते ५५च्या दरम्यान असून अंगावर निळ्या कलरचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. या अज्ञात व्यक्तीला कोणी ओळखत असल्यास ताबडतोब पाली पोलिसांना +९१२१४२२४२२२३ या क्रमांकावर कळवावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी केले आहे.



**पेण : भाजप कामगार आघाडी प्रदेश उपाध्यक्ष विनोद शहा यांनी कार्यकर्त्यांसह साखरचौथ गणपतीचे दर्शन घेतले.**

# 'विद्यार्थी निपुण होण्यासाठी शिक्षकांची जबाबदारी महत्त्वाची'

**मुरूड : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम शिक्षक करीत असतात. आज शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होत असून बदललेली शिक्षणशैली आत्मसात करून विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात निपुण करण्याचे महत्त्वपूर्ण कामगिरी शिक्षक बजावतात. त्यांच्याबद्दल मला निश्चितच अभिमान आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी अलिबाग येथे केले.





शिक्षक दिनाचे औचित्य साधून आमदार महेंद्र दळवी यांच्या पुढाकाराने अलिबाग, मुरूड व रोहा येथील सुमारे ३५ शिक्षकांना शाल, प्रमाणपत्र व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. यामध्ये रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षक, माध्यमिक विभाग व नगर परिषद शाळेवर असणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.

प्रमुख उपस्थितांमध्ये शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष राजा केणी, अलिबाग तालुकाध्यक्ष अनंत गोंधळी, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख संजीवनी नाईक, गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी, कोकण मराठी साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, मुरूड तालुका संघटक यशवंत पाटील, जिल्हा संघटक तृप्ती पाटील तसेच कार्यकर्त्यांसह तिन्ही तालुक्यातील केंद्रप्रमुख व शेकडोच्या संखेने शिक्षक उपस्थित होते.

या वेळी आमदार दळवी आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, शिक्षकांसाठी मुक्त वातावरण असून ते खऱ्या अर्थाने स्वतंत्र आहेत. शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित असून आगामी काळात ते सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे.

अलिबाग, मुरूडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी शैक्षणिक क्षेत्रात दोन्ही तालुके वेगाने घोडदौड करत असल्याचे सांगितले.

जिल्हा महिला आघाडी प्रमुख संजिवनी नाईक, तृप्ती पाटील यांनी तसेच शिक्षकांमधून हेमकांत गोयजी यांनी मनोगत व्यक्त केले.

सोहळ्याचे यशस्वी नियोजन नरेंद्र गुरव, नितीन पाटील, नितिश पाटील, सुनील पाटील, महेश कवळे, राजेंद्र नाईक, देवानंद गोगर, जगदीश चवरकर, प्रमोद भोपी, निलेश तुरे, विनोद कवळे यांनी केले, तर संजय पोईलकर, अजित हरवडे, निलेश वारगे यांनी नियोजनासह सूत्रसंचालन केले.

# माथेरानमधील विठ्ठल-रखुमाई मंदिर जीर्णोद्धारासाठी चंद्रकांत चौधरींचा पुढाकार



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील पंचवटी नगर येथील विठ्ठल-रखुमाई मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी मदतीचा हात पुढे केला असून मोडकळीस आलेले संपूर्ण मंदिर मी स्वखर्चाने बांधून देतो असे त्यांनी पंचवटीनगरमधील रहिवाशांची भेट घेऊन सांगितले.

माथेरान शहरातील पंचवटी नगरात २००३ साली उभारलेले विठ्ठल-रखुमाई मंदिर सद्यस्थितीत मोडकळीस आलेले आहे. या मंदिराची नव्याने उभारणी करण्यासाठी रहिवाशी निधीची जमवाजमव करण्यासाठी अनेक राजकीय मंडळींच्या गाठीभेटी घेत आहेत. स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनीदेखील आमदार निधीमधून काही रक्कम मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी मंजूर केली, मात्र कागदपत्रांची पूर्तताही काही नियमांमुळे हा निधी अडकून पडला. अखेर शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी तात्काळ पंचवटी नगर रहिवाशांची भेट घेऊन मंदिरासाठी लागणारा सर्व खर्च मी करतो, असे सांगितले. त्यामुळे मंदिराचे काम मार्गी लागणार आहे.

# पोलादपूरमध्ये कामगार कुटुंबांना भांडीवाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ओळखपत्र नोंदणी झालेल्या १७०० कामगार कुटुंबांना प्रत्येकी २० हजारांची मोफत भांडी दरवेळी पाचशे कुटुंब याप्रमाणे देण्यात येणार आहोत आणि कामगार कार्ड व आयुष्यमान कार्ड तसेच अनेक योजनांच्या पात्र लाभार्थ्यांची नोंदणी केल्यानंतर अधिकाधिक लाभ देणार, अशी ग्वाही राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन आणि खारजमीन खात्याचे मंत्री भरत गोगावले यांनी दिली.



पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ओळखपत्र नोंदणी झालेल्या ५०० कामगारांना प्रत्येकी २० हजार रुपयांची ५० प्रकारच्या भांडी वाटप करण्यात आली. त्या वेळी मंत्री गोगावले बोलत होते.

व्यासपीठावर माजी जि.प. उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुका प्रमुख निलेश अहिरे, कृउबा संचालक लक्ष्मण मोरे, संजय मोदी, कृष्णा नरे, महिला तालुका संघटक सुवर्णा कदम, नगराध्यक्ष शिल्पा दरेकर, नगरसेविका अस्मिता पवार, स्नेहल मेहता, भाजप मंडळ अध्यक्ष वैभव चांदे, सतीश शिंदे, राजेश डांगे, अनिल भिलारे, दत्ता मोरे, तळेकर, उद्योजक रामदास कळंबे, राजू रिंगे आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाप्रमुख निलेश अहिरे यांनी केले, रूपरेषा लक्ष्मण मोरे यांनी मांडली, तर प्रसाद साने यांनी सूत्रसंचालन केले.

